

खानदेशातील कृषक जीवन
सचित्र कोश
डॉ. रमेश सूर्यवंशी
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

# खानदेशातील कृषक जीवन

## सचित्र कोश

डॉ. रमेश सूर्यवंशी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती :** डिसेंबर, २००२

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

**किंमत :** ६० रुपये

## अनुक्रमणिका

# ऋण निर्देश

कृषि संस्कृतीचे बाळकडू पाजणारी माझी आई गं. भा. मंजुळाबाई. या प्रकारच्या संशोधन कार्याची प्रेरणा देणारे माझे गुरू कै. सु. बा. कुलकर्णी (भाषाशास्त्र, नागपूर), प्राचार्य रा. रं. बोराडे सर, डॉ. प्रभाकर मांडे सर, माझ्या संस्थेचे  सर्व संचालक आणि सहकारी, अखिल भारतीय खानदेश अकादमीचे सर्व सदस्य, मूळ प्रबंधातील चित्रे उद्‌धृत करण्याची परवानगी दिल्याबद्दल नागपूर विद्यापीठ आणि ती रेखाचित्रे तयार करून दिल्याबद्दल वैजापूरचे कला शिक्षक श्री. एम. टी. बावस्कर या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

या कोशाला साकार करणारे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष. सचिव, सर्व संचालक मंडळ, वाङ्मय प्रकल्प समितीचे सर्व सदस्य, मुद्रणशाळेचे व्यवस्थापक, सर्व सहकारी, संगणक तज्ञ आणि कला विभागातून रेखांकन करणारे तज्ञ या सर्वांचा मी ऋणी आहे.

**रमेश सूर्यवंशी**

अनुक्रमणिका

# निवेदन

अलीकडच्या काही वर्षांत ग्रामजीवनाला आधुनिकीकरणाला सामोरे जाण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. या आधुनिकीकरणामुळे गावगाड्यातील बलुतेदारांची अवजारे, शेतीतील अवजारे दिवसेंदिवस बदलत चालली आहेत. त्यांचे आकार बदलत चालले आहेत. त्यांच्याशी संबंधीत शब्दावली बदलत चालली आहे.

प्रमाण मराठीचा वापर करणाऱ्यांना अशा प्रकारच्या कृषीजीवनाशी संबंधीत शब्द हे अनाकलनीय वाटतात. शिवाय प्रत्यक्ष कृषी अवजारे व त्या अवजारांचे सचित्र त्यावेळी संदर्भासाठी पाहणे ही बाबही शक्य नसते. अशा वेळी अशा प्रकारच्या कोशाची आवश्यकता भासते. आधुनिक आणि प्राचीन वाङ्मयातील कृषीजीवनाशी संबंधीत शब्द या कोशाच्या आधारे अधिक स्पष्ट होऊ शकतात.

डॉ. रमेश सुर्यवंशी हे खानदेशात बोलल्या जाणाऱ्या अहिराणीचे गाढे अभ्यासक आहेत. याशिवाय ते स्वतः शेतकरी असून कृषी जीवनाशी त्यांची नाळ जुळलेली आहे. ते एक चिकित्सक संशोधक, स्वतः अहिराणी भाषिक आणि शेतकरी या त्रिवेणी संगमामुळे हा सचित्र कोशाचा मराठीतील पहिलाच प्रयत्न निश्चितच सकस असाच आहे. हा कोश खानदेश या भूप्रदेशाशी संबंधीत असला तरी तो अशा कामाच्या या मूलभूत कल्पनेचा एक नमुना ठरावा असाच आहे. ह्यावरून पुढे कोकण, विदर्भ, मराठवाडा या विविध विभागांतील सचित्र कोश तयार व्हावेत, अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुतचा "खानदेशातील कृषक जीवनविषयक सचित्र कोश" हा तौलनिक अभ्यासक, भाषा संशोधक, कृषी विद्यापीठे, कृषी क्षेत्रात आणि इतरत्र कार्यरत असणारे तंत्रज्ञ आणि तांत्रिक विद्यापीठे आणि कृषी जीवनावर भाष्य आणि संशोधन करणारे अभ्यासक आणि संशोधक यांना निश्चितच उपकारक ठरेल, असा विश्वास आहे.

मुंबई,
दिनांक २५ ऑक्टोबर २००२.

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

अनुक्रमणिका

# खानेदाशातील कृषक जीवन
# सचित्र कोश

## अनुक्रमणिका

(विषय सूची समोरील क्रमांक हे चित्र क्रमांक आहेत)


**ऋण निर्देश** ........................................ ४

**निवेदन** ........................................ ५

**सचित्र कोश – दोन शब्द** ........................................ ८

१. धाब्याचे घर (धाबानं घर) ........................................ १२

२. गृहरचना (२) ........................................ १५

३. गृहरचना (२) ........................................ १७

४. गृहरचना (३) ........................................ १९

५. गृहोपयोगी वस्तू (१) ........................................ २१

६. गृहपयोगी वस्तू (२) ........................................ २५

७. गृहोपयोगी वस्तू (३) ........................................ २७

८. गृहोपयोगी वस्तू (४) ........................................ ३०

९. गृहोपयोगी वस्तू (५) ........................................ ३३

१०. गृहोपयोगी वस्तू (६) ........................................ ३५

११. गृहोपयोगी वस्तू (७) ........................................ ३७

१२. स्त्रियांच्या गळ्यातील माळा ........................................ ४०

१३. शस्त्रे अवजारे ........................................ ४२

१४. बैलगाडीचे भाग (१) ........................................ ४४

१५. बैलगाडीचे भाग (२) ........................................ ४६

१६. बैलगाडीचे भाग (३) ........................................ ४८

१७. बैलगाडीचे भाग (४) ........................................ ५१

१८. बैलगाडीचे भाग (५) ........................................ ५३

१९. बैलगाडीचे भाग (६) ........................................................................ ५५
२०. कृषि – अवजारे (१) ........................................................................ ५८
२१. कृषि – अवजारे (२) ........................................................................ ६१
२२. कृषि – अवजारे (३) ........................................................................ ६५
२३. कृषि – अवजारे (४)........................................................................ ६७
२४. कृषि – अवजारे (५) ........................................................................ ७०
२५. कृषि – अवजारे (६) ........................................................................ ७२
२६. कृषि – अवजारे (७) ........................................................................ ७५
२७. कृषि – अवजारे (८) ........................................................................ ७८
२८. कृषि – अवजारे (९) ........................................................................ ८१
२९. कृषि – अवजारे (१०)........................................................................ ८३
३०. जनावरांशी संबंधित वस्तू ........................................................................ ८५
३१. जनावरांचे अवयव आणि साज........................................................................ ८८
३२. आंब्याची फळे तोडणे ........................................................................ ९१
३३. सुताराची अवजारे ........................................................................ ९३
३४. चांभाराची अवजारे (१)........................................................................ ९६
३५. चांभाराची अवजारे (२)........................................................................ ९८
३६. न्हाव्याची अवजारे ........................................................................ १०१
३७. लोहाराची अवजारे ........................................................................ १०३
३८. काड्यांपासून वस्तू बनविणे........................................................................ १०६
३९. मासेमारी........................................................................ १०८
४०. कापूस पिंजणे ........................................................................ ११०
४१. बांधकामासाठी लागणारी अवजारे ........................................................................ ११२
४२. पक्षी आणि पक्षांची शिकार........................................................................ ११४
४३. वाद्ये ........................................................................ ११६
४४. जलप्रवास ........................................................................ ११९
**शब्दसूची**........................................................................ १२१

# खानदेशातील कृषक जीवन

## सचित्र कोश - दोन शब्द

महाराष्ट्र हा खानदेश, मराठवाड, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र यांसारख्या अनेक भौगोलिक, सांस्कृतिक आणि भाषिक वैशिष्ट्यांनी नटलेला आहे. प्रत्येक भूभागाची संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. भाषा, ही तर संस्कृतीत रूजलेली असते. आणि या भूभागांतील भाषा, बोली ह्या भिन्न आहेत, वैशिष्ट्यपूर्ण आहेत. याच भागातील नव्हे तर संपूर्ण भारताची संस्कृती ही कृषिप्रधान आहे. भाषिक भिन्नत्व हे सांस्कृतिक भिन्नत्व, पर्यायाने कृषक जीवनातील भिन्नत्व दाखवीत तर नाही ना? या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपणाला प्रत्येक बोलीतील कृषि जीवनाचा स्वतंत्र अभ्यास करावा लागेल. महाराष्ट्राचा समग्र कृषिकोश वा सचित्र कृषिकोश बनविण्यापूर्वी स्वतंत्रपणे भूभागानुरूप, बोलीनुरूप कोश निर्माण करावे लागतील. त्या आधारे आपणास पुढे तौलानिक कोश तयार करता येतील. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास महाराष्ट्रातील विविध भागांतील बैलगाडीचेच उदाहरण घेतले तरी ही बाब ध्यानात येईल. खानदेशातील बैलगाडी आणि त्या बैलगाडीच्या अंगांची नावे ही विदर्भातील बैलगाडी, त्या बैलगाडीच्या अंगांची नावे यापेक्षा भिन्न आहेत. खानदेशातील लढेगाडं, मोठं गाडं आणि छकडं गाडं ह्या बैलगाड्या विदर्भातील खाचर, बंडी, रिंगी, पायटांगी या बैलगाड्यांहून भिन्न आहेत. एवढेच काय तर रिंगी, खाचर, बंडी ही बैलगाडीसाठीची त्या भूभागातील नावे आहेत हेही भिन्न भू-क्षेत्रातील मराठी वाचकाच्या लक्षात येत नाही. बैलगाडीच्या नावांची ही अवस्था तर त्या बैलगाडीच्या भिन्न अंगांसाठी वापरल्या जाणाऱ्या शब्दावलीची काय अवस्था असावी? असाच प्रकार इतर कृषि अवजारांचे बाबतीत आहे. खानदेशातील कोळप्याला विदर्भात डवरा तर मराठवाड्यात डूब्बं असे म्हणतात. एवढेच काय तर डवरनं, डूब्बनं आणि कोयपनं या एकाच कृषि क्रियेची भिन्न नावे असली तरी त्यांना शब्द म्हणून भिन्न भागात कृषि प्रक्रियेशिवायचे भिन्न अर्थ प्रचलित आहे. यासाठी विभागावर कृषिजीवनाचा सविस्तर अभ्यास मांडण्याची आवश्यकता आहे. यानुसार कृषि संस्कृतीच्या प्रगतीचा आलेखही आपणास चितारता येऊ शकेल. या दृष्टिने प्रस्तुतचा कोश हा खानदेश परिसरातील कृषि जीवनाचा कोश तयार करण्यात आला आहे.

प्रस्तुतच्या सचित्र कोशात चौरेचाळीस चित्रगट दिले आहेत. प्रत्येक चित्रगटात कृषि जीवनाला उपयुक्त असणाऱ्या अवजाराचा आणि त्यांच्या अंगांचा समावेश करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांच्या घरांची रचना, त्यांच्या घरातील आवश्यक भांडी व अवजारे, कृषि अवजारे, कृषक जीवनाशी संबंधित असणारे बलुतेदार आणि कारागीर यांची अवजारे व हत्यारे आणि त्यांची अंगे यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

हा सचित्र कोश इतर बोलीभाषेंच्या याच प्रकारच्या कामासाठी उपयुक्त ठरावा व क्षेत्रिय कार्य करणे या कोशा आधारे सोपे जावे म्हणून या सचित्र कोशातील चित्रांवर, अवजारांवर व त्यांच्या अंगांवर त्यांच्या नावांचा उल्लेख न करता त्या जागी फक्त क्रमांक देऊन तेथेच नामोल्लेख टाळून तो शब्द त्याच चित्रासमोरच्या पानावर देऊन त्या शब्दाचे थोडक्यात वर्णनही दिले आहे. त्यामुळे अभ्यासकांस त्या अवजाराचा व त्याच्या अंगांचा संपूर्ण परिचय होतो. क्षेत्रिय कार्याचे वेळी संशोधक निवेदकांसमोर फक्त चित्र ठेवतो. त्याची नावे व त्या अवजारांच्या अंगांची नावे ही झाकलेली असल्याने इतर बोलीच्या शब्दांचाही

अनुक्रमणिका

परिणाम या निवेदकावर होण्याची शक्यता टळते. शिवाय प्रत्यक्ष कृषि अवजार उपलब्ध नसले तरी चित्राच्या आधारे थोडी फार कल्पना निवेदकाला येऊ शकते.

एखाद्या शब्दावरून त्या शब्दाचे स्पष्टीकरण व त्या शब्दाचे चित्र हवे असल्यास, ते संशोधकास सहज मिळावे म्हणून या सचित्र कोशाचे शेवटी शब्दसूची दिली आहे. ही शब्दसूची अकारविल्याने असून त्यात जवळ जवळ सहाशे शब्द समाविष्ट करून घेण्यात आलेले आहेत. प्रत्येक शब्दासमोर तो शब्द ज्या चित्र-गटात आलेला आहे. तो चित्र-गट क्रमांक आणि त्या चित्रगटातील शब्दांचा क्रमांक दिलेला आहे.

खानदेशातील कृषक जीवन सचित्र कोष हा मराठीच्या वा बोलींच्या संदर्भातील सचित्र म्हणून पहिलाच प्रयोग असावा या दृष्टिने या कोशाचे महत्त्व अधिक आहे. काळाच्या प्रवाहात जूनी कृषि अवजारे ही नष्ट होत चाललीत. त्या सोबत त्या अवजारांशी संबंधित कृषि क्रियांची नावेही नष्ट होत चाललीत. कृषि जीवनाला पुरक अशा बलुतेदारांचीही अवजारे झपाट्याने बदलत चालली आहेत. प्रत्येक क्षेत्रात अधुनिकीकरण वाढत चालले आहे. नवी अवजारे, त्या अवजारांबाबतची नवी शब्दावली रूढ होत चालली. नव्या पिढीला आपली परंपरागत अवजारे चित्रांमध्ये तरी पाहता यावीत म्हणून जुन्या शब्दांना चित्रबद्ध करून ठेवण्याचा हा अल्पसा प्रयत्न हा सचित्र कोश करेल असा विश्वास वाटतो.

भाषा संशोधक, कृषि सहाय्यक, कृषि विद्यापिठे आणि तंत्र विद्यापिठे यांनासुद्धा हा कोश उपयुक्त ठरावा असा विश्वास वाटतो. खानदेशातील कृषक जीवनावर भाष्य. संशोधन करणाऱ्या संशोधकास क्षेत्रीय कार्यासाठीही हा कोश उपयुक्त ठरावा असा विश्वास वाटतो.

खानदेश हा इतर प्रादेशिक भूभागांप्रमाणे आपले स्वतःचे असे वैशिष्ट्ये जपून आहे. महाराष्ट्राच्या इतर भू भागातील (जसे मराठवाडा, विदर्भ, उर्वरित महाराष्ट्र) कृषि अवजारे आणि खानदेशातील कृषि अवजारे आणि त्यांच्याशी संबंधित शब्दावली वा या दोन भिन्न भू भागातील कृषक संस्कृती यांचा तौलनिक अभ्यास करणे या कोशाचे आधारे शक्य होईल.

कृषि विद्यापिठातील अभ्यासक आणि संशोधक यांना कृषि अवजाराचा आकार, त्यांच्याशी संबंधित शब्दावली यांची एकत्रित माहिती या कोशात उपलब्ध होऊ शकेल. कृषि अवजारांत करावयाच्या संशोधनासाठी मूळ कृषि अवजाराचा आकार व त्याच्याशी संबंधित शब्दावली कृषि संशोधकास उपयुक्त ठरावी अशीच आहे.

गावगाड्याच्या कामात गुतंलेल्या परंपरागत व्यवसाय करणाऱ्या बलुतेदारांची अवजारे हीसुद्धा झपाट्याने बदलत आहेत. त्यांची परंपरागत अवजारे आणि त्यांच्याशी संबंधित शब्दावली ही या सचित्र कोशामुळे बद्ध करता येणे शक्य होईल. त्याचा उपयोग तंत्र शिक्षणासाठी घेता येऊ शकेल.

चित्रकलेच्याही विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील सर्वच वस्तूंच्या चित्रांचे महत्त्व कळून येऊन तेही या कामी मदत करू शकतील. पुढे यातून चित्रकार आणि संशोधक यांची सांगड घातली जाऊन पुढील काम अधिक सकस होऊ शकेल.

अनुक्रमणिका

सचित्र कोशाचे संदर्भात हा पहिलाच प्रयोग विविध क्षेत्रांतील अभ्यासकांना प्रेरणादायी ठरावा.हा सचित्र कोश बृहत्कोशकार, तौलनिक अभ्यास करणारे अभ्यासक, भाषा संशोधक, कृषि संशोधक, चित्रकलेचे विद्यार्थी, तंत्रशिक्षणातील संशोधक या सर्वांना प्रेरणादायी ठरावा असा विशवास वाटतो.


**डॉ. रमेश सूर्यवंशी,**
कन्नड.

**अनुक्रमणिका**

# १. धाब्याचे घर (धाबानं घर)

अनुक्रमणिका

## १. धाब्याचे घर (धाबानं घर)




अनुक्रमणिका

खानदेशतील घरे ही साधारणतः मातीचे छत असणारी म्हणजे धाब्याची असतात. उंच ओटा, समोर ओंसरी. घडीव दगडावर उभे असलेले खांब त्यांना समोरच्या बाजूने उतार असलेले पत्रांची वा काड्यांच्या ताटव्याची ' मावठी ' असते.

(१) **पैया :** पैया म्हणजे पाया. जमिनीच्या आत खोदलेला चर वा त्यात भरलेले दगड वा त्यावर केलेले दगड वा विटांचे बांधकाम म्हणजे पाया वा पैया.

(२) **भीत :** भिंतीला भीत असे म्हणतात. ही दगड, विटा व मातीची असते. मातीच्या भिंतींस 'रद्दानी भीत' असेही म्हणतात.

(३) **धाबं :** धाबं हा शब्द छतासाठीही वापरला जातो. धाबं ह्या प्रकारचे छतात लाकडे, झाडाची पाने आणि त्यावरून माती अंथरतात. खाली पांढरी माती व वरून खारी ही माती अंथरतात 'खारी' या मातीत क्षाराचे प्रमाण अधिक असते.

(४) **सानं :** सानं म्हणजे घरात उजेड व हवा यावी म्हणून छताला ठेवलेले छिद्र, पावसाचे पाणी घरात वाहून आत येऊ नये म्हणून त्यावर खापराचे असे गोल तोंड सपाटीपासून थोडे वर करून ते मातीने लिंपून तयार करतात. 'साना सारनं, साना पोतारनं, साना झाकनं' हे या सान्याशी संबंधित क्रिया या 'सान्यास' काही भागात 'बोख्या' वा 'धारं' असेही म्हणतात.

(५) **बारी :** जेव्हा घराच्या छताचे हे छिद्र गोल व लहान न ठेवता ते चौकोनी, मोठे ठेवतात व आत मांजर कुत्रे वा चोर वरून येऊ नये म्हणून त्यावर आडव्या उभ्या गजांची विण वा जाळी बनवितात. अशा सान्याला "बारी" असे म्हणतात.

(६) **वरंडी :** घराच्या छतावर वर्षाआड वा दरवर्षी खारी नावाची क्षार युक्त माती पावसाळ्यापूर्वी टाकतात. त्यावेळी छताच्या चौफेरून आपल्या घराचे छताचे हद्दीपर्यंतची मातीची रांग ओततात. ही मातीची रांग म्हणजे वरंडी वा वरळी.

(७) **मावठी :** ओसरीच्या बाहेरून पावसाचे पाणी ओसरीत वा घरात येऊ नये म्हणून समोरच्या बाजूने तिरकस, झुकलेले लावलेले पत्रे वा तुरटीच्या काड्यांचा ताटवा वा 'झांजी'

(८) **घोडा :** ओसरीवर खांबाच्याही पुढे तिरकस पत्रे यावीत यासाठी पत्रांना खालून आधार द्यावयाचा असतो त्यासाठी त्यांच खांबाच्या वरच्या बाजूस अर्धगोल वा आखूड लाकडाची दांडी जी नक्षीकाम केलेली सुद्धा आढळते.

(९) **खाम :** खाम म्हणजे खांब.

(१०) **वटा, वसरी, जोतरं :** म्हणजे ओसरी वा ओटा. 'वटाचे' वर छत नसते तर 'वसरीचे' वर छत असते.

अनुक्रमणिका


(११) **पाह्यरी, पायथरी, पायथोरी :** म्हणजे पायरी.

(१२) **दार, कावड, दाऱ्हून :** म्हणजे दरवाजा.

(१३) **खिडकी :**

(१४) **खारीना भूगला (ए.व. भुगूल) :** खानदेशातील धाब्यांच्या घरांवर पावसाळ्यापूर्वी 'खारी' नावाची क्षारयुक्त माती धाब्यांवर टाकली जाते. या मातीचे संपूर्ण धाब्यांवर ठिकठिकाणी टोपलीने ढिग टाकतात. या ढिगास 'भुगूल' असे म्हणतात. भूगूल या शब्दाचे अनेकवचन भुगला.

## २. गृहरचना (२)



(१) **दार, कावड :** घराचा दरवाजा कावड, दाऱ्हून, दार म्हणून ओळखला जातो. खळे वा शेत यांस ओढून घ्यावयाचे जे फाटक असते त्यास मात्र 'झोपाटं' असे म्हणतात.

(२) **कडी, साकई :** साखळी वा दरवाज्याच्या कडीला कडी वा साकई असे म्हणतात.

(३) **मेन्डलं :** दरवाज्याच्या फळीवर ज्या आडव्या व उभ्या लाकडांचा वापर केलेला असतो त्या आडव्या लाकडांना 'मेंडलं' असे म्हणतात. लाकडावर ठोकलेला व पुढे आलेला दुसऱ्या लाकडाचा भाग म्हणजे मेंडलं.

(४) **भवरा :** भवरा म्हणजे भोवरा. भोवऱ्या सारखा, पुढे टोक असणारा व त्यावर कडी बसविलेला भाग, ज्याला धरून दरवाज्याची फळी पुढे ओढून घेता येते.

(५) **वातसाकई :** दरवाज्याची फळी व दरवाजाची चौकटीचे उभे लाकूड यांचा खालचा भाग यांना परस्परांना जोडणारी साखळी ही वातसाखळी म्हणून ओळखली जाते.

(६) **उमरट :** उमरट म्हणजे उंबरठा, चौकटीचे खालचे आडवे लाकूड.

(७) **उमरटना वटा :** चोकटी समोरचा लहानसा उंच ओट्याचा भाग.

(८) **कडी-कोंडा :** कडी व कोंडा, दरवाजाची कडी आणि कोंडा.


(९) **कलखूटी :** चौकटीच्या उभ्या लाकडांवरील भिंतीच्या बाजूने ठोकलेल्या लोखंडी पट्ट्या वा खिळे जे भिंतीच्या आत फसून त्या भिंतीला मजबुती आणतात; होलफास.

(१०) **कुस्सू :** लाकडाचे निमुळते टोक जे एखाद्या छिद्रात बसते ते टोक, कुसू.

(११) **आडोय् :** दरवाज्यास फळ्या लावून घेतल्यावर त्या बाहेरून ढकलून उघडता येऊ नये म्हणून त्यांच्या मागे लाववयाचे, दोन भिंतीच्या आतील छिद्रातील जाड लाकूड, हे लाकूड ज्याला आडोय् असे म्हणतात, ते एका बाजूच्या भिंतीच्या छिद्रात पूर्ण ढकलून देऊन मग फळ्या उघडता येतात. हा आडोय नावाचा दांडा एका भिंतीतून ओढून बाहेर काढलेले टोक समोरच्या भिंतीतील छिद्रात घालतात, त्यामुळे हे आडोय त्या दोनही फळ्यांना आडवे राहते.

अनुक्रमणिका

# ३. गृहरचना (२)



(१) **पव किंवा पोय :** लाकडाचे दोन भाग जोडण्यासाठी दोनही भागांचे खोबणीत फसणारा लाकडाचा (दोनही बाजूने खोबणीत फसेल असा आकार दिलेला) तुकडा, दोन खांडांना परस्परांपासून दूर जाता येऊ नये म्हणून दोहोना जोडणारा दुवा.

(२) **खांड :** धाब्याच्या घरांच्या तुळईचा एक मुख्य वासा; दोन खांबांवर विसावलेले जाड खोडासारखे लाकूड जे गोल वा आकार देऊन चौकोनी केलेले असू शकते.

(३) **टिटवं :** खांब आणि खांड यांच्या मधले जाड असे लाकूड. या टिटव्यावर मध्यभागी दोनही बाजूंचे दोन खांड येऊन मिळतात. या खांडांचा जोड या टिटव्यावर 'पव' ने जोडलेला असतो.

(४) **कुस्सू :** कोणत्याही लाकडाचा छिद्र्यात फसविता यावा म्हणून तयार केलेला निमुळता भाग, आत फसणारा भाग.


(५) **खिय्या :** खिय्या म्हणजे खिळा, कोणताही लोखंडी खिळा.

(६) **कुंबी :** खांब सहज जमिनीच्या आत रूतून खचू नये वा जमिनीशी त्याचा संपर्क येऊन त्यास किड लागू नये म्हणून तो ज्या दगडावर उभा केलेला असतो तो दगड. हा दगड सहसा चौकोनी किंवा गोल उभट असा घडीव असतो.

(७) **खाम :** खाम म्हणजे खांब, घरांचे खांब हे लाकडाचे गोल दांडी सारखे वा चौकोनी आकार दिलेले असतात. अशा चौकोनी लांब लाकडाच्या खांबाला वा खांडाला चार कोन व चार धारा असल्याने अशा प्रकारच्या लाकडास 'चौधारी' संबोधतात.

(८) **येल :** खांबाची एक रांग जिच्यावर खांडांची एक रांग बसविली आहे. येल ही दोनपेक्षा अधिक खांबांवर एकापेक्षा अधिक 'खांड' यांची बसविलेले एक रांग असते.

## ४. गृहरचना (३)




अनुक्रमणिका

**(१) कडी :** घरांच्या दोन तुळ्यांवर ठेवलेल्या लांब दांड्या या कड्या या नावाने ओळखल्या जातात. या कड्या गोल असल्यास त्या घराला गोलकडीनं घर तर त्या चौकोनी  वा चार धारा केलेल्या लांब दांड्या असतील तर 'चौधारी कडीनं' घर म्हणून ओळखले जाते. समोरासमोरच्या दोन तुळ्यांवर म्हणजे चार खांबांवर साधारणतः सहा ते आठ कड्या ठेवलेल्या आढळतात. या समोरासमोरच्या चार खांबांमधील जागा ही 'खन'  / 'खण'  म्हणून ओळखली जाते. या कड्यांवर लाकडी फळ्या अंथरून त्याचेवर पाने व माती अंथरतात. या फळ्यांना 'पाट्या'  व अशा घरांस 'कडीपाटनं'  घर असे म्हणतात.

**(२) खांड :** धाब्याच्या घरांच्या तुळईचा एक मुख्य वासा; दोन खांबांवर विसावलेले जाड खोडासारखे लाकूड जे गोल वा आकार देऊन चौकोनी केलेले असू शकते.


**(३) टिटवं :** खांब आणि खांड यांच्यामधले जाड असे लाकूड. या टिटव्यावर मध्यभागी दोनही बाजूंचे दोन खांड येऊन मिळतात. या खांडांचा जोड या टिटव्यावर ‘पव’ ने जोडलेला असतो.

**(४) खाम :** खाम म्हणजे घराचा खांब. हा खांब जमिनीवर 'कुंबी'  म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दगडावर उभा केलेला असतो. हा खांब वरच्या छताकडील टोकाला टिटव्याचे मध्यभागी असलेल्या छिद्रात फसविलेला असतो. हा खांब गोल वा कातीव चौकोनी आकाराचा लांब असतो. या खांबांवर वरच्या बाजूने वस्तू ठेवण्यासाठी मातीचे गोल आकाराचे ‘फूल’ केलेले असते. त्याच्या आत वस्तू ठेवतात.

**(५) कुंबी :** खांबाखालचा दगड हा 'कुंबी किंवा कुन्बी'  म्हणून ओळखला जातो. ही कुंबी चौकोनी, नक्षीकाम केलेली वा साध्या चापट दगडासारखी असू शकते.

अनुक्रमणिका

## ५. गृहोपयोगी वस्तू (१)




अनुक्रमणिका

# ५. गृहोपयोगी वस्तू (१)

(१) **सुरई :** सुरई ही मातीची असते. तिचा वापर पिण्याचे पाणी भरून ठेवण्यासाठी करतात. सुरईचा वापर उन्हाळ्यात थंडगार पाणी मिळावे म्हणून केला जातो. प्रवासातही सुरई वापरली जाते. सुरईचे आकार विविध आणि आकर्षक असे असतात. सुरईला पाणी ओतून घेण्यासाठी किटलीप्रमाणे वाकडे नळीवजा तोंड असते. सुरईचे आत पाणी भरण्यासाठी लहान **तोंड** असते. या तोंडाचेही विविध आकार आढळतात. निमुळत्या तोंडामुळे सुरईचे आत हात घालून तिला विसळून धुणे शक्य नसते.या सुरईला धरण्यासाठी मातीचीच कडी असते.

(२) **कडी :** सुरईची कडी जी मातीचीच असते, या कडीला धरून सुरई उचलता येते. प्रवासात धरून नेता येते.

(३) **तोंड :** सुरईच्या पाणी ओतण्याच्या व पाणी भरण्याच्या तोंडांना तोंड असे म्हणतात. पाणी ओतून काढावयाचे तोंड पक्षाच्या चोचीप्रमाणे लांब, विविध आकारांचे आढळते

(४) **घल्डी, घल्ली किंवा घागर :** मातीच्या हंडा किंवा कळशीप्रमाणे आकाराने लहान असणाऱ्या माठाला 'घल्डी' किंवा 'घागर' असे म्हणतात. या या घल्लीच्या साह्याने नदी वा विहीर यांवरून पाणी वाहून आणता येते. मात्र संपूर्ण कुटुंबाचे पाणी ज्या मातीच्या मोठ्या माठात भरून ठेवतात त्या गोल आकाराच्या मोठ्या माठाला **माथनी** तर उभट मातीच्या मोठ्या माठाला **राझन** असे म्हणतात.

(५) **बून किंवा सुरईनं बून :** 'बुन' म्हणजे बुड किंवा तळाचा भाग.

(६) **बसी, बशी किंवा बच्छी :** चहा पिण्याच्या चिनी मातीच्या कपबशीपैकी बशीला बसी, बशी किंवा बच्छी असे म्हणतात.

(७) **कोप किंवा कप :** चहा पिण्याच्या चिनी मातीच्या कपबशीपैकी कपाला कोप किंवा कप असे म्हणतात.

(८) **पिढं, पाटलं किंवा पाट् :** खाली जमिनीवर बसण्याऐवजी लाकडी पाटावर जेवणासाठी बसावयाची पद्धती आहे. या बसावयाच्या लाकडापासून बनविलेल्या पाटाला पिढं, पाटलं किंवा पाट् असे म्हणतात. विवाह प्रसंगी वा पूजेअर्चेच्या वेळी अशा पाटावर बसतात.

(९) **थाटी, थाटली, तह्याशी आणि बाडगी :** धातुच्या कोणत्याही पसरट तबकाला वा लहान ताटाला थाटली किंवा तयाशी वा तह्याशी असे म्हणतात. तर जेवणाच्या ताटाला वा मोठ्या तबकाला 'ताट' किंवा 'थाटी' असे म्हणतात.

(९अ) **बाडगी :** बाडगी म्हणजे मातीपासून तयार केलेले तबक. या मातीच्या तबकात भाजी वा भाकरी घेऊन जेवतात.

अनुक्रमणिका

(१०) **गडू किंवा गड्डू :** कोणत्याही धातूचा लहान तांब्या वा गडवा.

(११) **बादली :** मुख्यत्वे पाणी भरण्यासाठी वापरली जाणारी बादली.

(१२) **गिलास, गल्लास, पेला किंवा गलास :** ग्लास किंवा पेला.

(१३) **घागर आणि कयशी :** मातीच्या तहान माठाला घागर असे म्हणतात. या घागरीच्या साह्यायाने पाणी वाहूनही आणता येते वा त्यात पाणी साठवून ठेवता येते. तर धातूच्या लहान हंड्याला कयशी असे म्हणतात.

(१४) **तांब्या :** तांब्या हे पाणी घेण्याचे गोलाकार उभट भांडे, हे भांडे कोणत्याही धातूचे असू शकते. विदर्भात जर्मन धातूचा तांब्या जो शौचाला जाण्यासाठी वापरतात त्याला **थाली** असे म्हणतात.

(१५) **हंडा किंवा गुंडा :** पाणी भरण्यासाठी वापरतात तो धातूचा हंडा किंवा गुंडा.

(१६) **बोघनं :** बोघनं म्हणजे पातेले. लहान पातेल्याला बोघनी तर मोठ्या पातेल्याला बोघनं असे म्हणतात.

(१७) **बोघनी :** आकाराने लहान असलेले पातेले किंवा लहान पातेली.

(१८) **खुरपनी, उचटनी, सराटा किंवा उलथनी :** तव्यावरच्या गरम भाकरी उलथण्यासाठी वापरतात तो उलथा. याला खानदेशात विविध भागात खुरपनी, उचटनी, सराटा किंवा उलथनी अशी नावे आढळतात.

(१९) **पई आणि पय :** भाजी शिजविताना हलविण्यासाठी व नंतर वाढण्यासाठी वापरला जाणारा खोल असा चमचा, पळी, मात्र लग्न कार्यासाठी जास्तीच्या लोकांच्या स्वयंपाकाच्या वेळी भाजी हलविण्यासाठी वापरला जाणारा खूप मोठा, लांब दांडीचा चमचा '**पय**' म्हणून ओळखला जातो.

(२०) **परात किंवा कोपर आणि पायं व काठोक :** भाकरी बनविण्यासाठी पिठ मळण्याचे व ज्यात भाकरी थापून भाकरींना गोल आकार देतात ते मोठे धातूचे परात 'परात' किंवा 'कोपर' या नावाने ओळखले जाते. तर हेच परात जर मातीपासून तयार केलेले असेल तर त्यास ' पायं ' असे म्हणतात आणि भाकरी बनविण्यासाठी जे लाकडापासून तयार केलेले परात वापरतात त्यास 'काठोक' असे म्हणतात.

(२१) **झ्यारा / झॅरा :** वडे वा शेव बनविण्यासाठी वा गरम तेलातून तळलेले पदार्थ काढण्यासाठी वापरतात तो असंख्य छिद्रे असलेला व धरावयास दांडी असलेला झारा.


(२२) **डवला किंवा चंपा :** भाजी हलविण्यासाठी वा वाढून देण्यासाठी वापरला जाणारा पळीपेक्षा कमी खोल व आखूड चमचा.

**अनुक्रमणिका**

(२३) **रिकाबी :** रिकाबी ही वरून चिनी मातीचा थर दिलेली पत्र्याची तबक, अशी तबक विशेषत्वे मुसलमान लोक सर्रास वापरताना आढळतात.

अनुक्रमणिका

## ६. गृहपयोगी वस्तू (२)



अनुक्रमणिका

# ६. गृहोपयोगी वस्तू (२)

(१) **पाटा :** मसाला वाटण्यासाठी वापरावयाचा दगडाचा पाटा जो चापट दगडासारखा असतो. ज्याचा पृष्ठभाग टाकीच्या साह्याने टाकून खरबरीत केलेला असतो. वऱ्हाटा — पाटा म्हणजे वरवंटा- पाटा

(२) **वऱ्हाटा :** वऱ्हाटा म्हणजे वरवंटा ज्याचे साह्याने पाट्यावर मसाल्याचे पदार्थ वाटतात.

(३) **खलबत्ता :** मसाला वा मिरची कांडण्यासाठी वापरतात तो खल (बत्याला मुस्सयी हा वेगळा शब्द प्रचलित आहे.)

(४) **मुस्सयी :** खलबत्त्यातील बत्ता जो एकदिड फूट लांब व गोल असून लोखंडाचाच असतो.

(५) **सहान :** जिच्यावर चंदन लेप वा औषधी घासून उगाळतात ती पोळपाटासारखी विशिष्ट प्रकारच्या दगडाची सहान्.

(६) **उख्खय :** उख्खय म्हणजे उखळ. उखळ हे दगडाचे असून त्याचा बराच भाग जमिनीत गाडलेला असतो. त्यात लाकडी मुसळाच्या साह्याने मिरची बारीक करतात. वा डाळींचे वा तांदळाचे कवच साफ करतात.

(७) **मुस्सय :** उखळातील वस्तू कांडावयाचे लाकडी मुसळ ज्याची लांबी साधारणतः तीन फुटांहून अधिक असते. याचे समोरच्या भागावर ते फुटू नये म्हणून गोल अशी धातूची पट्टी ठोकलेली असते. तीला 'जडाव' असे म्हणतात.

(८) **दगडी :** खलबत्ता हा लोखंडाचा असतो तर दगडी ही  ओला मसाला वा मिरच्यांचा ठेचा बारीक करण्यासाठी वापरावयाचा दगडाचा खलबत्त्या सारखाच एक प्रकार आहे. याचा खल हा दगडाचा, उखळापेक्षा लहान व उथळ टोपीसारखा लांबट वा गोलाकार असतो. त्यात वापरावायायची मुसळी ही दगडाचीच असते. ती मुसळीवरून दर वेळी आदळून वस्तू बारीक न करता ती घासूनही बारीक करतात. मुसळी ही अर्धा ते पाउण फूट लांबीची असते. खलबत्ता आणि उखळमुसळी या दोहोंमधला 'दगडी'  हा प्रकार आहे.


(९) **वऱ्हाटा किंवा मुस्सयी :** या दगडीसाठी वापरायाच्या मुसळीला वऱ्हाटा किंवा मुस्सयी असे म्हणतात.

(१०) **चवरंग :** चौरंगाला चवरंग असे म्हणतात. सत्यनारायणाची पूजा मांडण्यासाठी व विवाहाचे वेळी वराला उभे करण्यासाठी चौरंग वापरला जातो. हा लाकडाचा असून अर्धाएक फूट उंचीचा नक्षी काम केलेला, बसण्यायोग्य असा मोठ्या पाटाचाच एक प्रकार असतो. मात्र याला चार सुंदर असे कातीव पाय असतात.

(११) **पिढं, पाटलं किंवा पाट :** बसावयाचा लाकडी पाट.

अनुक्रमणिका

# ७. गृहोपयोगी वस्तू (३)




अनुक्रमणिका

# ७. गृहोपयोगी वस्तू (३)

**(१) डेगडी किंवा तपेलं :** पाणी साठविणे वा तापविणे यासाठीचे साधारणतः चापट बूड असणारे विशिष्ट आकाराचे भांडे.

**(२) बोघनं :** मोठे पातेले, याला काही भागात 'गंज' असेही म्हणतात. तर लहान पातेलीला 'बोघनी' किंवा 'गंजी' असे म्हणतात.

**(३) कढाय :** कढाय म्हणजे कढई. हीचा वापर विशेषत्वे पदार्थ तळण्यासाठी करतात. ही स्वयंपाक घरातील कढई. मात्र उसापासून गूळ तयार करताना ज्यामध्ये रस आटवून गूळ तयार करतात त्या पसरट मोठ्या भांड्यांलाही कढाय असेच म्हणतात.

**(४) कोयपाट किंवा पोयपाट :** पोळपाटाला 'पोयपाट' किंवा कोयपाट' असे म्हणतात. याचेवर पोळी लाटून तयार करतात.हा लाकडापासून तयार केलेला गोल असा फळीचा पाट असतो.

**(५) लाटनं किंवा बेलनं :** पोळ्या लाटण्यासाठी वापरतात ते लाटणे. हे लाकडाचे आढळते.

**(६) सांडसी, सांडस्नी किंवा कडची :** चुलीवरचे गरम भांडे खाली उतरविण्यासाठी जी पकड वापरतात ती पकड म्हणजे 'कडची,' 'पकड' किंवा 'सांडशी.' काही वेळा या सांडसऐवजी खराब कपड्यांचाही वापर करतात. उष्ण भांडे चुलीवरून उतरवितांना हाती धरावयाच्या या कापडांना '**हादरन**' असे म्हणतात.

**(७) खुरपनी, उचटनी किंवा सराटा :** भाकरी तव्यावर उलथण्यासाठी वापरावयाची, चापट पाते असणारी उचटणी किंवा उलथा. गाव जेवनाचे वेळी जो मोठा सराटा भात अगर शिरा हलविण्यासाठी वापरतात त्याला **खुरपा** असे म्हणतात.

**(८) डबी, डब्बी किंवा डबडी :** चिमुकला डबा. लहान डबी.

**(९) चकरीना डबा :** चापट गोल डबा, पोळ्या ठेवण्यायोग्य चापट गोल डबा.

**(१०) कडीना डबा :** कडी असणारा डबा.

**(११) डबा किंवा डबडं, टिप किंवा टिपडं :** कोणताही डबा. मात्र टिपडं हा शब्द फक्त पत्राच्या डब्यासाठीच वापरला जातो.

**(१२) चुल्हा व उलचूनना चुल्हा :** चुलीला चुल्हा असे म्हणतात. आवूल, उल्हा किंवा उल म्हणजे उपचूल, चुलीतून जिच्या आत ज्वाला जातात व ज्यावर दुसरे भांडे ठेवून अन्न पदार्थ शिजविणे शक्य होते अशी उपचूल म्हणजे 'उलचून' अशी उपचूल असणारी चूल म्हणजे उलचूनना चुल्हा.

अनुक्रमणिका

**(१३) उल्हा, आवूल किंवा उलचून :** उल्हा किंवा उलचून म्हणजे उपचूल. या उपचुलीत मुख्य चुलीतूनच ज्वाला येत असतात.

**(१४) थाना :** थाना म्हणजे स्तन. येथे थाना म्हणजे चुलीचे वर आलेले उंच भाग ज्यांचे वर भांडे ठेवले जाते. त्या उंच भागामुळे धूर न होता जाळ भांड्याला व्यवस्थित लागतो.

**(१५) चुल्हा :** चूल, चुलीचा मुख्य भाग.

**(१६) भानस, भानसी, वटली किंवा परोटी :** चुली समोरचा भाग जेथे विस्तव पुढे ओढून भाकरी शेकतात.

**(१७) परात :** भाकरी थापण्याचे धातूचे परात.

**(१८) घंगाय किंवा गंगाय :** स्नानासाठी पाणी ज्यात घेतात ते पसरट तोंडाचे भांडे जे विशेषत्वे तांबे या धातूचे असते.

**(१९) डालकी, टोपली किंवा भाकरीस्नी डालकी :** भाकरी ठेवण्यासाठी वापरतात ती काड्यांपासून तयार केलेली टोपली.

**(२०) धुडक किंवा कुडधान किंवा भाते :** भाकरी ठेवावयाच्या टोपलीत अंथरावयाचा कापडाचा तुकडा.

**(२१) पोयपाट लाटनं :** पोळपाट लाटणे.

अनुक्रमणिका

## ८. गृहोपयोगी वस्तू (४)



# ८. गृहोपयोगी वस्तू (४)

**(१) कडीन भांड :** दोनही बाजूंनी कढईप्रमाणे कान असणारे (गोल कड्या) पातेल्यासारखे भांडे; ज्याचेवर झाकणही असते.

**(२) कॅटली, क्याटली किंवा च्यॅटली :** चहाची किटली. बैठकीत चहा या किटलीत आणून तो कपांमध्ये ओततात.

**(३) जग :** पाणी वाढण्यासाठी वापरले जाणारे उभट आकाराचे, धरून ओतता येईल अशी कडी असणारे व समोरच्या बाजूने पाणी व्यवस्थित पडावे म्हणून किंचित चोचीसारखे निमूळते टोक असणारे भांडे.

**(४) वरणी :** पंक्तीत वरण वाढावयाचे भांडे. या भांड्याचा आकार खोल टोपलीसारखा असून वरून धरायला कडी असणारा व समोरच्या बाजूने वरण वाढता यावे म्हणून निमूळते टोक असणारा असतो.

**(५) प्याला, गिल्लासं किंवा जाम :** पाणी पिण्यासाठी वापरावयाचा प्याला किंवा ग्लास.

**(६) झॅरा :** गरम तेल असणाऱ्या कढईतून तळलेले पदार्थ काढण्यासाठी वापरतात तो असंख्य छिद्रे असणारा झारा.

**(७) चाटू :** पापडांचे पिठ शिजविताना ते पीठ हलविण्यासाठी ज्या लाकडी मोठ्या पळीचा वापर करतात ती लाकडाची पळी.

**(८) रही :** वरण किंवा लोणी घुसळण्यासाठी वापरतात ती रवी. ही सहसा लाकडाची असते. तिच्या तळाच्या भागाला फूल असे म्हणतात.

**(९) लाटनं. किंवा बेलनं :** पोळी लाटण्यासाठी वापरले जाणारे लाटणे किंवा बेलणे.

**(१०) वगरायं, वगराये किंवा वगराळं :** पापडांचे गरम पिठ ओतून पापड बनविण्यासाठी वापरायचा आखूड दांडीचा पण लहान पातेली वजा खोल तोंड असणारा चमचा; ओगराळे.

**(११) खुरपनी :** भाकरी उलथविण्यासाठी वापरावयाचा उलथा किंवा उलथनी, समोरचे चापट पाते असून मागे लांब दांडी असते.

**(१२) पई :** भाजी वाढण्याचा चमचा किंवा पळी.

**(१३) सांडसी किंवा पकड :** चुलीवरचे गरम भांडे उतरविण्यासाठी वापरावयाची पकड वा विशिष्ट प्रकारचा चिमटा.

अनुक्रमणिका

(१४) **शकुंतला भांडं :** झांकण असलेल्या पातेलीसारखे विशिष्ट प्रकारचे भांडे.


(१५) **कडीना तांब्या :** प्रवासात पाणी वा तीर्थ वाहून नेण्यासाठीचा कडी असलेला विशिष्ट प्रकारचा तांब्या.

(१६) **भटूर :** एक विशिष्ट प्रकारचा मिश्र धातू, जोरात आदळल्यावर ज्याचा तुकडा पडतो. अशा या भटूर नावाच्या धातूपासून बनविलेले वरण शिजविण्यासाठीचे चेंडूच्या आकाराचे, वर लहान तोंड असणारे एक भांडे.

(१७) **घोटा :** पापडांचे पिठ शिजविताना त्याला हलविण्यासाठी 'हाटण्यासाठी' वापरतात तो लाकडाचा एका टोकाकडे जाड असणारा दांडा.

अनुक्रमणिका

# ९. गृहोपयोगी वस्तू (५)




अनुक्रमणिका

# ९. गृहोपयोगी वस्तू (५)

(१) **तह्यासा किंवा तैसा :** काड्यांच्या टोपल्या सुरक्षित राहाव्यात व वर्षभर प्रसंगानुरूप वापरता याव्यात म्हणून त्यांना छताला टांगलेल्या विशिष्ट प्रकारच्या शिक्यात ठेवतात. हे शिके लहान बाज किंवा बंगई सारखे असून दोऱ्यांनी विणलेले असते. ते जमिनीपासून खूप उंच छताला टांगलेले असते.

(२) **तिव्हई :** तिव्हई हा तीन पायांचा चिमुकला 'स्टूल' तिपाई, यावर पूर्वी कंदील ठेवत असत.


(३) **शिकं :** शिकं म्हणजे शिके. मांजर, कुत्रा यापासून अन्नपदार्थ, भाकरी, दही, दूध सुरक्षित रहावे म्हणून ते छताला उंच टांगलेल्या शिक्यांत ठेवतात. हे शिकं म्हणजे एक लाकडाची चिमुकली चौकट, दोऱ्यांनी वा तारेने छताला टांगलेली असते.

(४) **घडोन्सी, घडोस्नी, घडोन्ची, मायची, किंवा घोडी :** घोडी, मायची वा घडोन्ची म्हणजे अंथरून ठेवावयाची चारपाई किंवा घोडी.


(५) **घोडी :** पाणी पिण्याचा माठ ठेवण्यासाठीची तिपाई वा घोडी.

अनुक्रमणिका


# १०. गृहोपयोगी वस्तू (६)




१




७



३०

# १०. गृहोपयोगी वस्तू (६)

(१) **खाट आणि खटली :** झोपण्यासाठी वापरतात ती खाट. बाज किंवा चारपाई. लहान मुलांसाठीची चिमुकली खाट ही 'खटली' म्हणून ओळखली जाते. ती मोठ्या खाटेसारखीच असते.

(२) **माचा किंवा पाय :** खाट, घडोन्ची अथवा मायची यांचा पाय किंवा ठावे.

(३) **आडं गात :** बाजेचे वा खाटेचे चौकटीचे आडवे लाकूड वा आडवी दांडी.

(४) **पायत किंवा पायते :** ज्या बाजूला झोपताना पाय करून झोपतात ती खाटेची बाजू. या बाजूला दोऱ्यांची विशिष्ट वीण असते. याच्या विरुद्धची बाजू म्हणजे 'उसे किंवा उस्ते' या बाजूला डोके करून झोपतात.

(५) **हूबं गात :** बाजेच्या वा खाटेच्या चौकटीचे उभे लांब लाकूड किंवा दांडी.

(६) **जीव किंवा जीउ :** बाजेला दोरीच्या साह्याने विणलेले असते ही गुंफण विशिष्ट प्रकारची असते. या खाटेच्या वीणीतील मध्य भागातील खाटेच्या चौरसाच्या विणेला कर्ण (भूमिती) करणाऱ्या दोन दोऱ्यांचे पदर हे जीव म्हणून ओळखले जातात.

(७) **मायची :** माळोचा. शेतात झोपण्यासाठी वापरतात ती रुंदीला कमी असणारी व उंच पाय असणारी बाज किंवा खाट.


(८) **कुस्सू :** एका छिद्रात दुसऱ्या लाकडाचा भाग फसावा म्हणून त्याला जो निमुळता आकार दिलेला असतो तो निमूळता भाग म्हणजे कुस्सू.

(९) **गाला :** कुस्सू हे निमुळते टोक ज्या छिद्रात फसविले जाते ते छिद्र म्हणजे गाला.

(१०) **पायना :** लहान मुलांना झोपण्यासाठी वापरतात तो पाळणा.

अनुक्रमणिका

## ११. गृहोपयोगी वस्तू (७)



# ११. गृहोपयोगी वस्तू (७)

(१) **पाटलं, शेवयास्नं पाटलं किंवा शिय्या इयानं पाटलं :** शेवया तयार करण्याचे लाकडाच्या फळीसारखे पाट. या फळीला तिरपे ठेवून तिच्या एका टोकावर बसून स्त्री तिच्यावर पिठाचा गोळा मागे पुढे हातांनी दाब देऊन घासते व शेवया बनविते.

(२) **टेकन :** शेवया बनविताना तो पाट तिरपा ठेवण्यासाठी त्याला खालून जो टेकू देतात तो टेकू. येथे टेकू म्हणून पालथी मारलेली बादली किंवा जात्याच्या पाळूचा वरचा भाग व खुंटा वापरतात.

(३) **उंडा :** शेवया तयार करण्यासाठी घेतलेला भिजविलेल्या पिठाचा गोळा.

(४) **शिई :** शेवई, अनेकवचन – शिय्या किंवा शेवया.

(५) **खाट :** झोपण्यासाठी वापरतात ती बाज किंवा खाट.

(६) **सोरा, कुल्लयास्ना सोरा :** साचा; कुरडया बनविण्यासाठी वापरतात तो साचा.

(७) **घटे :** धान्य दळून पीठ करावयाचे दगडाचे जाते. लाकडापासून तयार केलेल्या जात्याला **घटोर** असे म्हणतात. जात्यांच्या आकारानुसार व त्यांच्या कामांच्या प्रकारानुसार **भरगडं** हा लहान जात्याचा प्रकारही आढळतो.

(८) **तई :** जात्यांचे पाळू, खाळच्या पाळूला 'खालनी तई' तर वरच्या तळीला वा पाळूला 'वऱ्हनी तई' असे म्हणतात.

(९) **पोयपाट किंवा कोयपाट :** पोळ्या लाटण्यासाठी वापरतात ते पोळपाट.

(१०) **लाटनं :** पोळ्या लाटण्याचे लाटणे किंवा बेंलणे.

(११) **धाबाना पापडे :** शिजविलेल्या पातळ पिठाचे घराच्या छतावर ओतून तयार केलेले पापड. खानदेशातील बहुतांश घरे ही मातीच्या धाब्यांची असतात. या धाब्यांचा उपयोग पापड बनविणे, डाळी वा धान्य वाळविणे यासाठी करतात.

(१२) **सोऱ्या, कुल्ड्या किंवा कुरड्या :** गहू भिजवून त्यांचा चिक काढून, तो शिजवून साच्याच्या साह्याने कापडावर गोलगोल कुरडया करतात. पापडांचाच एक प्रकार. यांना काही भागात सोऱ्या तर काही भागात कुल्डया असे म्हणतात.

(१३) **खुटा :** खूंटा, जात्याचा खूंटा. याला धरूनच जाते फिरविले जाते व धान्याचे पीठ होते.

अनुक्रमणिका

**(१४) माखनीना खूटा :** जात्याच्या 'खालच्या पाळूच्या'  मध्यभागी खाली जमिनीत रूतणारा आणि वरच्या बाजूने वरच्या पाळूच्या 'माखनी' या केंद्रात बसणारा खूंटा हा 'माखनीना खूटा'  म्हणून ओळखला जातो. 'माखनी' लाकडापासून बनविलेली असते. ती वरच्या पाळूच्या मोठ्या छिद्राला वरची पाळू खूंट्या भोवतीच फिरावी म्हणून मर्यादित करते. ते छिद्र खुंटा फसेल एवढेच राहिल्याने जात्याची वरची पाळू खालच्या पाळूवरच गोलाकार फिरू शकते.


**(१५) डरना किंवा दरना खुटा :** माखनीना खुटा हा खालच्या पाळूतून आरपार गेलेला असतो. त्याचा खालचा भाग जाड असून तो जमिनीत पुरलेला असतो. त्यामुळे जात्याची खालची पाळू जागेवरून हलत नाही. डर किंवा दर म्हणजे जमिनीला पाडलेले गोलाकार छिद्रे. असे छिद्रे पाडून फसविलेला खूंटा तो 'दरना खुटा'

**(१६) वऱ्हली तयी किंवा वऱ्हेनी तयी :** जात्याची वरची तळी किंवा पाळू.

**(१७) पेन्ड किंवा घट्याना पेन्ड :** जात्याच्या वरच्या पाळूचे वजन वाढविण्यासाठी त्याचेवर ठेवतात तो गोल मांडोळीसारखा दगडाचा गोल.

अनुक्रमणिका

## १२. स्त्रियांच्या गळ्यातील माळा




अनुक्रमणिका

## १२. स्त्रियांच्या गळ्यातील माळा

(१) **मंगयसुतरं :** मंगळसूत्र, विवाहित स्त्री गळ्यात कोणत्याही प्रकारच्या माळेत मध्यभागी मंगळसूत्र ओवते.

(२) **बोरमाय :** बोरांच्या आकाराच्या सोन्याचे मणी असणारी माळ. या मण्यांवर नक्षी असते.

(३) **एकदानी :** ह्या माळेच्या प्रकारात पन्नास सोन्याचे मणी आढळतात. बोरमायपेक्षा या माळेतील मणी हे आकाराने लहान असतात.

(४) **तांदूईपोत :** या माळेच्या प्रकारातील मणी हे तांदळाच्या दाण्यासारखे लांबट आकाराचे आणि दोन्ही बाजूला निमुळते होत गेलेले आढळतात.

(५) **चितांग :** चितांग या माळेचे मणी चापट व आयताकृती असून त्यांच्या लांबीच्या समांतर व रुंदीच्या मध्यातून दोरा ओवला जातो. ही माळा सोन्याच्या पट्टयाप्रमाणे दिसते.

(६) **पुतई :** पुतई किंवा पुतया या माळेच्या प्रकारात एकूण अठरा पुतळ्या असतात. प्रत्येक पुतळी ही रुपयाच्या नाण्याच्या आकाराची व तीन ग्रॅम वजनाची असते. वर दोरा किंवा तार ओवण्यासाठी एक छिद्राची कडी असते.

(७) **पुतई :** काही वेळा प्रत्येक पुतळीनंतर मिठोड हा जाळीदार मणी असतो. तो सुद्धा सोन्याचाच असतो. सर्व पुतळ्या ह्या सुताने गुंफून माळ तयार केलेली असते. गाठनं म्हणजे सुताने गुंफून माळा तयार करणे. यावरून या गुफलेल्या पुतळ्यांच्या माळेला 'पुतयास्न गाठलं' असेही म्हणतात.

(८) **गरसोयी :** गरसोयी किंवा गिरसायी या प्रकारच्या माळेत मिठोड नावाचे विशिष्ट आकाराचे मणी असतात. मिठोड हा जाळीदार अंडाकृती मणी असतो. प्रत्येक मिठोडनंतर एक चापट ताईताच्या आकाराचा मणी ओवलेला असतो.


(९) **पोत किंवा कायीपोत :** विवाहीत स्त्री गळ्यामध्ये काळ्या काचेच्या मण्यांची माळा घालीत असते. त्या माळेला कायीपोत असे म्हणतात. पोत म्हणजे माळा.

(१०) **वजरंटिक :** वजंरटिक म्हणजे वज्रटिक. या माळेच्या प्रकारात सोन्याच्या मण्यांच्या तीन पदरी माळा सुताच्या किंवा रेशमाच्या कापडावर बसविलेल्या असतात. या कापडाच्या पट्टीला गादी असे म्हणतात.

(११) **मिठोड :** माळेत ओवावयाचा सोन्याचा अंडाकृती जाळीदार मणी.

अनुक्रमणिका

## १३. शस्त्रे अवजारे




अनुक्रमणिका

# १३. शस्त्रे अवजारे

**(१) इय्या :** विळा हे गवत कापण्याचे साधन हे अर्धचंद्रकार पाते असणारे असून याला धरायला लाकडाची मूठ असते.

**(२) खुरपं :** विळ्याच्याच आकाराचे पण गवत खुरपणीच्या वा निंदण्याच्या कामासाठी वापरले जाणारे एक साधन.

**(३) कोयता :** उस तोडण्यासाठी वापरावयाचे कोयता हे तिक्ष्ण पाते असणारे साधन. लोणच्याच्या कैऱ्यांच्या फोडी करण्यासाठी मोठ्या अडकित्त्यासारखा अडकित्ता वापरतात त्यास कोयता किंवा 'सूडा' असे म्हणतात.

**(४) पावसी :** पावसी किंवा पावशी म्हणजे स्वयंपाक घरातील भाजीपाला, कांदे इ. कापावयाची विळी.

**(५) चाकू :** चाकू चाकूला तिक्ष्ण पाते असते. काही चाकूंचे पाते दुमडता येते अशांना घडीना चाकू असे म्हणतात.

**(६) पत्ती, लेझरपान किंवा ब्लेडपान :** दाढी करण्यासाठी वापरतात ते ब्लेड.

**(७) सुरा :** खाटीक बोकड कापण्यासाठी वापरतो तो सुरा.

**(८) आडकित्ता :** सुपारी फोडण्याचा अडकित्ता. लोणच्याच्या कैऱ्या फोडण्यासाठीही विशिष्ट प्रकारचा अडकित्ता वापरतात, यास सूडा असेही म्हणतात.

**(९) तलवार :** तलवार, पूर्वीच्या काळी युद्धात तलवार वापरली जात होती.


**(१०) चाकू, घडीना चाकू :** ज्याची घडी करता येऊ शकते असा चाकू.

**(११) भाला किंवा बल्लम :** शेतकरी शेताची राखण करताना रात्रीचे वेळी भाला बाळगतात. याला काही भागात बल्लम असेही म्हणतात.

**(१२) गुप्ती :** गुप्ती ही लाकडाच्या छडीमध्ये  गुप्तपणे दडविलेली असते. गुप्त असे तिक्ष्ण पाते जे छडीमध्ये बेमालूमपणे दडविता येते असे शस्त्र.

अनुक्रमणिका

# १४. बैलगाडीचे भाग (१)




अनुक्रमणिका

# १४. बैलगाडीचे भाग (१)
## (कठडा)

**(१) पेटी / आकपेटी :** बैलगाडीच्या कठड्याखालील हा भाग असून यात दोन्ही चाकांचा आस असतो. एका लाकडी चौकोनी लांब अशा ओंडक्यात आस हा कोरून बसविलेला असतो. या लोखंडी आसाचे लाकडी कवच म्हणजे पेटी. या पेटीत 'आक' असल्यामुळे हिला 'आकपेटी' असेही म्हणतात.

**(२) आक :** बैलगाडीची चाके ज्या लांब अशा लोखंडाच्या (आसाच्या ) दांड्याच्या दोनही टोकांवर बसविलेली असतात तो आस वा आक. हा आस दोनही चाकांच्यामध्ये असून यावर चढवलेली दोनही चाके या आसावर आसाभोवती फिरतात.

**(३) वंगणी :** चाक फिरत असताना ते आतल्या बाजूने 'पेटीच्या' लाकडावर घासू नये म्हणून पेटी व चाक यामध्ये असणारी लोखंडाची चकती. या चकतीवर नेहमी घर्षण टाळण्यासाठी वंगण लावतात.

**(४) जडाव किंवा जडाव पट्टी :** कोणतेही अवजाराचे लाकूड उलून त्यास तडे जाऊ नयेत व ते अधिक काळ टिकावे म्हणून त्यावर चढविलेली अर्धा ते पाव इंच रुंदीची लोखंडाची पट्टी म्हणजे जडाव.

**(५) गाला :** ज्या छिद्रामध्ये एखादे लाकडाचे टोक फसविले जाते ते फसणाऱ्या टोकाचे मापाचे छिद्र म्हणजे गाला, असा गाला साटलीला असल्याने त्यास 'साटलीना गाला' असे म्हणतात. तर पेटीला असणाऱ्या गाल्याला 'पेटीना गाला' असे म्हणतात.

**(६) आखरी :** बैलगाडीचा कठडा आणि आसाची पेटी यामध्ये असणारा भाग म्हणजे अखरी. ही आखरी साधारणतः इंग्रजी यू या अक्षरासारखी असते. तीचे दोनही बाजूचे भाग जेवढे उंच असतील तेवढी बैलगाडी उंच बनते. कारण त्या उंच भागावरच बैलगाडीचा कठडा बसविला जातो.

**(७) कुस्सू, साटलीना कुस्सू :** एका लाकडाचे जे निमुळते टोक दुसऱ्या लाकडाचे छिद्रामध्ये (गाला) फसवितात ते निमुळते केलेले टोक हे कुस्सू म्हणून ओळखले जाते. प्रत्येक लाकडी अवजार वा वस्तूंची जोडणीमध्ये कुस्सू हे असतात. ते नसतील तर अवजार वा फर्निचर हे कमकुवत ठरते.

**(८) आया किंवा आळा :** आखरी आणि पेटी या दोन अंगांना परस्परांशी एकत्रीतरीत्या बाधून ठेवणारा दोर म्हणजे आळा. 'आया' या दोराचे अनेक वेडे या आखरी व पेटीभोवती गुंडाळलेले असतात.


**(९) आख्खर पेटी :** आखरी व पेटी ही एकत्रीतरीत्या 'आया' या दोराचे साह्याने बांधली जाऊन ती एकत्रीतरीत्या 'आखरी पेटी' या नावाने ओळखली जाते. या आखरी पेटीवरच बैलगाडीचा कठडा ठेवलेला असतो.

**(१०) साटली किंवा दंडा :** आखरीच्या दोन छिद्रांमध्ये ज्या दोन लांब दांड्या फसविलेल्या असतात त्या मुख्य लांब दांड्या. यानाच पुढच्या टोकावर जू बांधतात. याच दांड्यावरील फळीवर गाडी हाकणारा बसत असतो.

अनुक्रमणिका

# १५. बैलगाडीचे भाग (२)

## (कठडा)




अनुक्रमणिका

## १५. बैलगाडीचे भाग (२)
### (कठडा)

**(१) पाखं किंवा बाही :** बैलगाडीच्या कठड्याची एक बाजू एका कडेची बाजू.

**(२) साटा किंवा कठोडाना साटा :** बैलगाडीच्या कठड्याची मूळ चौकट किंवा सांगाडा. या सांगाड्यावरच कठडा उभारलेला असतो.

**(३) कठोडं :** बैलगाडीचा कठडा.

**(४) खूटलं किंवा सिपाई :** कठड्याच्या दोनही बाजू ज्या उभ्या असतात त्या अनेक उभ्या खुंटांच्या साह्याने बनलेल्या असतात. या प्रत्येक उभ्या खुंटाला शिपाई किंवा खूंटल असे म्हणतात.

**(५) हूबा गाते :** बैलगाडीच्या कठड्याच्या चौकटीच्या लांबीचे लाकूड हे 'हूब' गात म्हणून ओळखले जाते.

**(६) सराटी :** बैलगाडीच्या (पाखं किंवा बाहीचे जे उभे खुटले वा शिपाई असतात त्या) खुटल्यांना जोडणाऱ्या लाकडाच्या व लोखंडाच्या आडव्या पट्ट्या.

**(७) बुट्या किंवा बुध्या :** बैलगाडीच्या चौकटीच्या उभ्या गातांचे दोनही बाजूंची शेवटची टोके जी गोल व जाड असतात ती ‘बुट्या’ किंवा ‘बुध्या’ म्हणून ओळखली जातात.

**(८) कोरमगात :** बैलगाडीच्या कठड्याच्या चौकटीचे रुंदीच्या बाजूची दोनही आडवी लाकडे.

**(९) घोडा :** या चौकटीच्या कोरमगातच्या समांतर त्या चौकटीला आडव्या लाकडाच्या चार पट्ट्या असतात त्यांना घोडा असे म्हणतात.


**(१०) कडी :** या कठड्याच्या मागच्या व पुढच्या दोनही बाजूंना कोरम गात या लाकडांवर कड्या बसविलेल्या असतात. त्या कड्या (अनेकवचन).

**(११) कामडी भरेल कठोडं :** बांबू चिरून त्याच्या कामट्यांच्या पट्ट्यांनी गुंफलेला बैलगाडीचा कठडा.

**(१२) जडाव पट्टी :** कठड्याच्या आतील भागात बांबूच्या कामट्या अंथरून त्यांना खिळे मारताना त्या सर्व पट्ट्यांवरून चापट पत्र्याची पट्टी वापरतात. ही पट्टी व 'घोडा' या लाकडाच्या पट्टयांमध्ये या कामट्या परस्परांना खेटून घट्ट बसतात.

अनुक्रमणिका

## १६. बैलगाडीचे भाग (३)
(चाक)




अनुक्रमणिका

# १६. बैलगाडीचे भाग (३)
## (चाक)

(१) **चाक :**बैलगाडीचे चाक. अशा दोन चाकांना शेतकरी 'जोड' या शब्दानेही ओळखतात.

(२) **पाठं :** बैलगाडीचे चाकाचे पाठे. ज्या वाकड्या, अर्धगोल तुकड्यांचे मिळून संपूर्ण चाक बनते. त्या प्रत्येक तुकड्याला पाठं असे म्हणतात. एका चाकात साधारणपणे सहा 'पाठे' असतात.

(३) **आरं किंवा आरवं :** बैलगाडीच्या चाकातील उभे आरवे. प्रत्येक पाठ्यात दोन असे एकूण बारा आरवे बैलगाडीच्या चाकात आढळतात.

(४) **तुमडं :** बैलगाडीच्या चाकाचा तुंबा. चाकाचा केंद्रक असणारा भाग. ज्याचेवरील छिद्रांमध्ये आरवे फसविलेली असतात.या आरव्यांवर पाठे फसवून चाकाचा गोलाकार बनविलेला असतो. तुंबडं किंवा तुमड ज्याला तुंबा असेही म्हणतात तो मध्यभागी पोकळ असल्याने तो आसात फसविलेला असतो. तो आसाभोवती फिरतो म्हणूनच चाक गोलाकार फिरते.

(५) **आमनं किंवा आमने :** बैलगाडीचे चाक आसाभोवती फिरताना त्या चाकाचे तुमडे घासून झिजू नये म्हणून त्या तुमड्यात फसविलेली लोखंडाची नळी जी तुमड्याच्या लांबी इतकी लांब असते.

(६) **वंगनी :** बैलगाडीचा तुंबा/ तुमडे व पेटी यांच्यात घर्षण होऊ नये म्हणून त्या दोहोमध्ये असलेली लोखंडाची गोल चकती, जिच्यावर नेहमी वंगण लावतात.

(७) **आक् :** बैलगाडीचा आक किंवा आस. या आसाभोवती बैलगाडीची चाके फिरतात. हा आस दोनही चाकांपर्यंतचा सलग असा एकच आस असतो. हा आक् लाकडाच्या 'पेटीत' फसविलेला असतो. दोनही टोकांना दोन चाके असतात. हे चाक बाहेर पडू नये म्हणून या आसाच्या टोकावर चाकाच्या बाहेरच्या बाजूने कानखीई हा खिळा फसविलेला असतो.

(८) **कानखीई :** बैलगाडीचे चाक फिरताना आसातून निघून गळून पडू नये म्हणून त्या आसाच्या टोकावरील छिद्रात चापट, वाकडा असा खिळा खोचलेला असतो. तो खिळा सहज निघू वा पडू शकणार नाही असा वाकडा असतो.

(९) **गाला :** ज्या छिद्रामध्ये एखादे लाकडाचे टोक फसविले जाते ते फसणाऱ्या टोकाचे मापाचे छिद्र म्हणजे गाला. तुमड्यात आरवे फसविता यावेत म्हणून त्याला जी छिद्रे असतात ती छिद्रे म्हणजे गाला.

(१०) **कुस्सू :** एका लाकडाचे जे निमुळते टोक दुसऱ्या लाकडाचे छिद्रामध्ये (गाला) फसवितात ते निमुळते केलेले टोक हे कुस्सू म्हणून ओळखले जाते. प्रत्येक लाकडी अवजार व वस्तूंची जोडणीमध्ये कुस्सू हे असतात. ते नसतील तर अवजार वा फर्निचर हे कमकूवत ठरते. असे कुस्सू बैलगाडीच्या

चाकाच्या प्रत्येक आरव्यांच्या दोनही टोकांना  असतात. हे कुस्सूं वा निमुळती टोके तुमड्यांत व पाठ्यात फसविलेली असतात.


**(११) जडाव किंवा जडाव पट्टी :** कोणतेही अवजाराचे लाकूड उलून त्यास तडे जाऊ नये वा ते अधिक काळ टिकावे म्हणून त्यावर चढविलेली अर्धा ते पाव इंच रुंदीची लोखंडाची पट्टी म्हणजे जडाव.

**(१२) धाव :** चाकाची धाव, चाकावरील लोखंडी पट्टीचे आवरण. चाकावर चढविलेली मोठी लोखंडाची मांडोळी जी सर्व पाठ्यांना घट्ट चिटकून फसून बसते.

**(१३) सुरस्या किंवा पव :** चाकाच्या दोन पाठ्यांना जोडताना त्यांच्या परस्परात घुसून बसणारा, दोनही  बाजूंनी टोकदार असणारा खिळा. अशाच प्रकारचे खिळे जे दोन अंगांना जोडतात पण हा खिळा त्या दोनही अंगात रुतून बसत असल्याने तो दिसत नाही.

अनुक्रमणिका

# १७. बैलगाडीचे भाग (४)




अनुक्रमणिका

# १७. बैलगाडीचे भाग (४)

(१) **दुस्सेर :** बैलगाडीची जू. बैलांना गाडीला जुंपल्यावर त्यांची मान या जू खाली असते.

(२) **शिव्वय किंवा सिव्वळ :** बैलांना जुंपल्यानंतर त्यांची मान जू खालून निघून जाऊ नये म्हणून या जूला बैलांच्या मानेवर ठेवून त्या जूला लटकविलेला पट्टा (जोतं) बैलांच्या गळ्याखालून घेऊन त्यांचे टोक जूच्या टोकावरील छिद्रात फसविलेल्या शिव्वय या काडीला गुंडाळतात. ही शिव्वळ सहसा इंग्रजी 'वाय' या अक्षरासारखी असते.

(३) **नाथी किंवा नाथी पट्टी :** जेथे शिव्वळ फसविली जाते त्या छिद्राच्या जागी जू कमकुवत होऊ नये म्हणून तेथे पत्र्याची पट्टी ठोकलेली असते ती पट्टी म्हणजे नाथी किंवा नाथी पट्टी.

(४) **येलं :** जू ही औताला दोराच्या साह्याने बांधण्याऐवजी रबराची गोल मांडोळी अडकवून बांधतात. ही रबराची मांडोळी सायकलच्या टायरसारखी असते. वरून रबर व आतून असंख्य तारा असतात. या रबराच्या मांडोळीला 'येल' असे म्हणतात.

(५) **नाडी :** जू औताला वा बैलगाडीला बांधण्यासाठी जो जाड दोर वापरतात तो दोर.

(६) **हाड्या :** न जूंपलेल्या बैलगाडीचा समोरचा जू चा भाग जमिनीवर टेकू नये व तो वरचेवर राहावा म्हणून खालच्या बाजूने तीरपे गोल दिडदोन फुटाचे कातीव नक्षीकाम केलेले बैलगाडीचे अंग. बैलगाडीच्या जू खालील टेकू.

(७) **साटली किंवा दंडा :** बैलगाडीचा कठडा ते जू यांच्यामधील दोन लांब दांड्या, ज्यांची टोके जू जवळ एकत्रीत येतात बैलगाडीचे धूरे.

(८) **सराटी :** बैलगाडीच्या साटलीच्या दोनही लांब दांड्याच्या मध्यभागी असणारी लाकडाची वा लोखंडाची पट्टी.


(९) **माकडं किंवा माकोडं :** सराटी आणि साटलीच्या दोन लांब दांड्या या तिघांना परस्परांपासून दूर सरकू नये व मजबुती रहावी म्हणून ठोकलेल्या लोखंडाच्या पट्ट्या. या तीन ते चार जागी असतात.

(१०) **जोतं :** बैलांना गाडीला किंवा औताला जुंपण्यासाठी त्यांची मान आणि जू यांना गुंडाळणारा पट्टा. जुपण्या.

(११) **बनपट्टी :** जू चे लाकूड उलू नये वा फुटू नये म्हणून दोन ते चार ठिकाणी त्या जूवर ठोकलेली पत्र्याची पट्टी.

अनुक्रमणिका

# १८. बैलगाडीचे भाग (५)




अनुक्रमणिका

# १८. बैलगाडीचे भाग (५)

**(१) हाड्या :** बैलगाडीचा जू आणि समोरचा भाग वर ठेवणारा. टेकू म्हणून काम करणारा बैलगाडीचा भाग.

**(२) साटली किंवा दंडा :** बैलगाडीचा धुऱ्या; बैलगाडीचा कठडा ते जू यामधील लांब दांड्यांचा भाग.

**(३) दुस्सेर :** जू. बैलगाडीची जू; जुंपलेल्या बैलांच्या मानेवर असणारा दांडीसारखा भाग.

**(४) नाडी :** औताला किंवा बैलगाडीला जू बांधावयाचा दोर; जू ज्या दोराने बांधतात तो दोर.

**(५) जोतं :** बैलांना जुंपण्यासाठी वापरतात त्या जुंपन्या. गाडीला किंवा औताला जुंपलेल्या बैलाची मान जू खालून निघून जाऊ नये म्हणून मानेभोवती असणारा व ज्याची  दोनही टोके जूला अडकविलेली असतात असा पट्टा.

**(६) शिव्वय :** जूच्या दोनही बाजूंच्या टोकावरील छिद्रात खोचलेल्या इंग्रजी वाय आकाराच्या एखादा फूट लांब असणाऱ्या काड्या. बैलाच्या मानेभोवती गुंडाळलेल्या जुपनीच्या पट्ट्याचे एक टोक या काडीभोवती बांधलेले असतो.

**(७) शिंगाड – पाटली :** बैलगाडी चालविणारा जेथे बसतो त्याचे पुढे एक फळी असते व तिच्यात उभारे फसविण्यासाठी दोन्ही बांजूना दोन छिद्रे असतात. अशा फळीला शिंगाड पाटली असे म्हणतात.

**(८) शिंगाड, सिंगाडे :** बैलगाडीचे उभारे. कठड्या समोरील फळीच्या दोनही बाजूंनी तिरकस उभ्या खोचलेल्या लांब दोनही दांड्या शिंगाडे म्हणून ओळखले जातात. बैलगाडीत चारा, कणसे वा कापूस आणताना ही शिंगाडे लावली जातात. हा काढता घालता येणारा भाग असतो.


**(९) धाव किंवा माडोयी :** बैलगाडीच्या लाकडाच्या चाकावर चढविलेली लोखंडाची मांडोळी.

**(१०) नया :** नळा; बैलगाडीच्या चाकांना वेळोवेळी वंगण देता यावे म्हणून ज्यात वंगण ठेवतात तो बांबूचा पोकळ नळकांडेवजा तुकडा, हा बैलगाडीच्या कठड्याखाली वंगणाने भरून बांधलेला असतो.

**(११) कुची :** ब्रश, बैलगाडीच्या चाकांना वंगण देण्यासाठीचा तार व त्याच्या टोकांवर चिंध्या बांधून तयार केलेला ब्रश.

अनुक्रमणिका

## १९. बैलगाडीचे भाग (६)



## १९. बैलगाडीचे भाग (६)

(१) **छकडं, गाडं किंवा छकडी :** लहान बैलगाडी, या गाडीला वरून गोलाकार असे बांबूच्या पट्ट्यांचे छत असते. यावरून कापडाचा पडदाही घालता येतो. या गाडीतून विवाहितांना पडदा लावून, उन्हापासून संरक्षण घेऊन प्रवास करणे शक्य होई. या गाडीस वरून बांबूच्या पट्ट्यांचा तट्टा असल्याने 'तट्टानीगाडी' पडदा लावण्याची सोय असल्याने 'परदानी गाडी' असेही संबोधतात.

(२) **तट्टा :** बांबूच्या पट्ट्यापासून बनविलेला ताटवा जो बैलगाडीवर छत म्हणून लावलेला असतो. बांबूच्या पट्ट्यांची उभी व आडवी गुंफण करून हा तट्टा तयार केलेला असतो.

(३) **परदा किंवा पडदा :** बैलगाडीच्या वरून घातलेला कापडाचा पडदा. जो विशिष्ट पद्धतीचा तट्ट्याच्या मापाचा शिवून घेतलेला असतो.

(४) **साटली :** बैलगाडीचे धूरे; कठडा ते जू यामधील लांब दांड्यासारखा बैलगाडीचा भाग.

(५) **पांजरी :** बैलगाडीच्या मागच्या भागातील फळी जीच्यावर पेटी वा प्रवासाचे सामान ठेवता येते व प्रवास्यांस आत मोकळे बसता येते. ज्याला 'कॅरिअर' असेही म्हणता येईल.

(६) **जोतं :** बैलांना जुंपण्यासाठीच्या जूंपन्या. जूपताना बैलांच्या गळ्याभोवती बांधावयाचा पट्टा.

(७) **शिव्वय :** जू च्या दोनही टोकांना बसविल्या जाणाऱ्या दोन इंग्रजी वाय आकाराच्या काड्या. यांना बैल जुंपल्यानंतर जोतं किंवा जुपण्यांची टोके अडकवितात.

(८) **दुस्सेरः** जू; बैलगाडीचा किंवा औताचा 'जू' ज्याचे खाली जुंपलेल्या बैलांची मान असते तो गाडी वा औताचा भाग.

(९) **मोठ गाडं किंवा मोठी गाडी :** बैलगाडीचा एक प्रकार. हा शेतीमाल व अवजारे वाहून नेण्यासाठी वा प्रवासासाठी वापरला जातो.

(१०) **खुटला किंवा घोडा :** बैलगाडीच्या कठड्याच्या उभ्या भागांच्या दांड्या ह्या एका अंगाला आठ असतात. यांमुळे कठडा दोनही बाजूने बंदीस्त बनतो.

(११) **चाक :** बैलगाडीचे चाक. हे चाक आरवे, पाठे यांनी गोलाकार बनलेले व वरून 'धाव' ही मांडोळी चढविलेले असते.

(१२) **बैठक पाटली किंवा बेंडनी :** बैलगाडी हाकणारा ज्या फळीवर बसतो ती फळी.

(१३) **सिंगाड पाटली :** बैलगाडीच्या कठड्यासमोरील फळी जिचेवर उभारे फसविण्यासाठी दोन छिद्रे असतात. उभाऱ्यांना 'सिंगाडे' तर त्या फळीला 'सिंगाड पाटली'असे म्हणतात.

अनुक्रमणिका


**(१४) सिंगाड किंवा शिगांडे :** बैलगाडीचे उभारे. हे मालाच्या वाहतुकीच्या प्रकारानुसार लावले जातात.

**(१५) तन्न्या :** बैलगाडीचा कठडा आणि साटली यांना जोडणाऱ्या दोऱ्या वा तारांचा पीळ. कठडा गाडीच्या मूळ सांगाड्यावरून उचकून बाजूला जाऊ नये म्हणून या तन्न्या बांधणे आवश्यक असते.

**(१६) आडन्नी किंवा पेंडनी :** बैलगाडीच्या चाकांना बैलांचा मागचा भाग लागून त्यांना जखम होऊ नये म्हणून चाक आणि बैल यांच्यात आड येणारे आडवे लाकूड, जे कठड्यासमोरच्या भागाला हाकणारा ज्या फळीवर बसतो त्याच्या फळी खालून बांधलेले असते.

अनुक्रमणिका

## २०. कृषि - अवजारे (१)




अनुक्रमणिका

# २०. कृषि – अवजारे (१)

**(१) नागर, लाकडया नागर किंवा लाकड्या :** नांगर, नागर हा सपूर्ण लाकडाचा असतो तेव्हा त्याला लाकड्या नागर किंवा लाकड्या असे म्हणतात.

**(२) हायस :** नांगराची लाब दांडी जीचे एक टोक नांगराच्या मुख्य अंगाला तर दुसरे टोक जू पर्यंत असते.

**(३) कऱ्हो :** नांगराचे रूमणे; नागराचे साह्याने शेतात नांगरताना बैल तो नांगर ओढतात. तेव्हा त्या नांगराला हाताने धरून उभेच ठेवावे लागते. त्यासाठी नांगराला मुख्य भागाला लागून वर आलेला उभा दांडा असतो व त्याला धरण्यासाठी आडवी मूठ असते. या सर्व भागाला 'कऱ्हो' असे म्हणतात. मात्र वखर किंवा तिफन यांच्या अशाच प्रकारच्या धरावयाच्या उभ्या दांडीला व त्याच्या मुठीला कऱ्हो न म्हणता 'रूम्हनं' असे म्हणतात.

**(४) मूट् :** मूठ, औत चालवताना जेथे धरतात ती आडवी, मुठीत मावेल अशी दांडी.

**(५) कूस्सू किंवा हायसना कूस्सू :** कूस्सू म्हणजे एखाद्या छिद्रात फसविण्यासाठी निमूळते केलेले टोक. हायस हा लांब दांडा नांगराच्या लोड या भागात फसविता यावा म्हणून या हायसला कूस्सू म्हणजे निमूळते टोक काढलेले असते.

**(६) गाला:** ज्या छिद्रात निमुळते टोक फसविले जाते ते छिद्र म्हणजे गाला; छिद्र, भोक वा अवजाराचा खोलगट भाग.

**(७) नागरखोय :** नांगरखोळ; नांगराचे ईडे; नांगराचे जमिनीत फसणारे टोक हे पोलादी असते. ते टोक म्हणजे नांगराच्या लोड या मुख्य भागावर पहार बसविलेली असते. ही पहार त्या नांगराच्या लाकडी टोकावर बसविण्यासाठी पहार व नांगर यांना एकत्रीत ठेवणारे विशिष्ट आकाराचे ईडे.

**(८) कूस्सा :** नांगराचे पुढचे टोक जमिनीत रूतावे म्हणून त्या टोकावर बसविली जाणारी पहार म्हणजे कुस्सा.

**(९) कोंडकं :** नांगराला वा वखराला जू बांधताना काही वेळा दोरी न वापरता कोंडकं मणी यांचा वापर होतो. कोंडकं व मणी हे लाकडापासून तयार केलेले असून या दोहोंना एका दोरीत ओवून त्यांचा गोल औताचे लांब दांडीत अडकवून मणीच्या दुसऱ्या छिद्राला त्या औताचे दोर बांधतात. कोंडक्याचा आकार मध्यभागी खोलगट असल्याने त्या भागात औताची दांडी सहज बसते.


**(१०) लोड :** नांगराचे मुख्य अंग ; नांगर याच अंगावर कऱ्हो कुस्सा आणि हायस जोडलेली असतात.

अनुक्रमणिका

**(११) मणी :** मणी हा लाकडाचा भाग असून तो तरफेचे काम करतो. मणी हा चापट लाकडाच्या फळीचा सहा ते दहा इंच लांबीचा तुकडा असून त्याच्या दोनही टोकांवर दोन छिद्रे असतात. या छिद्रातून दोऱ्या ओवून परस्पर विरुद्ध दिशेला ओढून बांधता येतात. असा मणी गाडीत वरपर्यंत चारा वा ऊस भरतानाही वापरतात. तर औताला कोंडक्यासह वापरतात.

अनुक्रमणिका

# २१. कृषि - अवजारे (२)




अनुक्रमणिका

(१) **लोखंड्या किंवा लोखंडया नांगर :** लोखंडाचा आधुनिक नांगर; बळीराम नांगर

(२) **वख्खर :** शेत वखरण्याचे अवजार; औत. हाच वखर आकाराने मोठा असेल तर त्यास 'डांख्या' असे म्हणतात.

(३) **हायस :** नांगराची लांब दांडी. ही दांडी नांगराच्या मागच्या फळीपासून ते पुढे बैल जुंपतात तेथपर्यंत लांब असते.

(४) **फाय :** नांगराचा फाळ. हा नांगराचा जमिनीत घुसून जमिनीची नांगरणी करणारा भाग असतो.

(५) **साकई :** साखळी. नांगराला बैल जुंपताना नांगर ते बैलांची  जू या दरम्यान लोखंडाची साखळी बांधलेली असते.

(६) **चाक :** नांगराचे समोरचे चाक हे 'हायसच्या' पुढच्या टोकावर असते. ते जमिनीवर घासून नांगराला पुढे ओढण्यास सुकरता आणते.

(७) **कडी :** जेथे नांगराला साखळी बांधतात ती नांगराची लोखंडाची कडी.

(८) **मूटः** नांगराची मूठ. जो भाग धरून नांगर चालविला जातो तो हातात धरावयाचा नांगराचा भाग.

(९) **लामदांडी :** लांब दांडी. तिफण. वखर यांच्या लांब दांडीला लाम दांडी म्हणतात. मात्र नांगराच्या लांब दांडीला 'हायस' असे म्हणतात.

(१०) **दुस्सेर :** बैल जुंपतात ती जू. ही बैलांच्या मानेवर असते.

(११) **जोतं :** बैलांना गाडीला किंवा औताला जुंपण्यासाठी त्यांची मान आणि जू यांना गुंडाळणारा पट्टा. जूपन्या.

(१२) **कोंडकं :** औताला जू अडकविण्यासाठी लाकडाचे साधारणतः इंग्रजी पसरट यू या अक्षराप्रमाणे बनविलेल्या ह्या कोंडक्याला दोन बांजूना दोन छिद्रे असतात. यात दोरी ओवून कोंडकं व दोरी यांचा 'गोल' औताच्या लांब दांडीत अडकवून जू वरून घेऊन मणीला किंवा औताच्या दोरीला बांधतात. या बांधण्याच्या क्रियेला 'औत नाडनं' असे म्हणतात लाकडाचे हे कोंडके दांडीखाली असल्याने औत चालताना दोरी झिजून तुटू शकत नाही.

(१३) **मनी :** मणी हा चापट लाकडाच्या फळीचा सहा ते दहा इंच लांबीचा तुकडा असून त्याच्या दोनही टोकांवर दोन छिद्रे असतात. या छिद्रातून दोऱ्या ओवून परस्पर विरुद्ध दिशेला ओढून बांधता येतात. असा मणी गाडीत वरपर्यंत चारा वा ऊस भरतानाही वापरतात. तर औताला कोंडक्यासह किंवा कोंडक्याशिवाय वापरतात.

अनुक्रमणिका

**(१४) शिव्वय :** शिवळा; जूच्या दोनही टोकांवरील छिद्रातील अडकविलेल्या काड्या जुंपलेल्या बैलांच्या जूपन्या या शिवळांना अडकविलेल्या असतात.

**(१५) लोड किंवा वख्खरना लोड :** वखर, नांगर यांच्या मुख्य भागाला लोड असे म्हणतात. वखराच्या लोड या भागाला इतर सर्व भाग जसे रूम्हनं, लामदांडी, दाता व पास इ. येऊन मिळालेले असतात.

**(१६) रूम्हनं :** रूमने, औताची हातात धरावयाची मूठ व मूठ असलेला हा दांडा.

**(१७) पास :** वखराची पास. पास जमिनीवर घासून चालते. त्यामुळे तृण निघून जमिनीचा थर खाल वर होऊन मशागत होते.

**(१८) दात किंवा दाता :** ज्यात पास फसविली जाते ते लाकडाचे दोन (आठ ते दहा इंच लांबीचे) दातासारखे दोन भाग.

**(१९/२०) आरनी काठी :** बैल हाकावयाची काठी. या काडीच्या टोकावर बैलांना टोचण्यासाठी एक तिक्ष्ण खिळा असतो. या खिळ्याला **'आर'** किंवा **'आरू'** असे म्हणतात.

**(२१/२५) इत्ती आणि इत्तीनी काडी वा कयक :** काडीच्या टोकावर बसविलेले चापट पोलादी पाते, याचा उपयोग औताच्या पास या भागाला लागलेली ओली माती व गवत काढण्यासाठी होतो. या इत्ती लावलेल्या काडीला **इत्तीनी काडी** किंवा **कयक** असे म्हणतात.

**(२२) येलं :** सायकलीच्या टायरसारखे असणारे रबराची गोल मांडोळी जी औताला जू अडकविण्यासाठी वापरतात.

**(२३) भरन :** औत जमिनीत रुतावे म्हणून त्या औतावर वजन म्हणून ठेवलेला दगड.


**(२४) खरदांडी :** वखर, कोळपे यांच्या लोड या मुख्यदांडी पासून निघून लांब दांडीवर विसावणारी वाकडी दांडी. 'लोड' 'लांबदांडी' आणि ‘खरदांडी' यांच्या त्रिकोणावर 'भरन' हा वजनाचा दगड ठेवतात.

अनुक्रमणिका

# २२. कृषि अवजारे (३)

अनुक्रमणिका

# २२. कृषि - अवजारे (३)



# २२. कृषि – अवजारे (३)

(१) **पाम्हेर, पांभेर किंवा पाम्हर :** पेरणीसाठी वापरतात ती तिफण.

(२) **दांडी :** तिफणाची दांडी, लांबदांडी.

(३) **खरदांडी :** लोड या मुख्य भागातून निघून तिरकस अशी लांबदांडीवर असणारी एक दांडी. या दांडीमुळे लोड या मुख्य भागाजवळ एक त्रिकोण तयार होतो त्यावर वजनाचा दगड 'भरण' ठेवतात.

(४) **लोड किंवा पाम्हरना लोड :** तिफणाचा मुख्य भाग, जो एक जाड ओंडक्यासारखा असतो. यावरच दांडी, फण, लांबदांडी, खरदांडी वा नळ्या बसविलेल्या असतात.

(५) **रुमनं :** औताला चालविताना शेतकरी ज्या भागाला हाती धरून चालतो ती मूठ व जेथे ती मुठ बसविली आहे असा उभा लाकडाचा दांडा; रुमणे.

(६) **मूट :** रुमण्याची मूठ; मूठीत धरावयाची लाकडाची लहान दांडी.

(७) **चाडं :** पेरणीच्यावेळी जेथे मुठीने बी पेरण्यासाठी टाकतात ते तिफणाचे तीन छिद्रे असणारे तोंड.

(८) **फन :**तिफणाचे जमिनीवर रुतणारे तीन दात वा फण.

(९) **नई :** नळी, अनेक वचन – नया म्हणजे नळ्या. तिफणाच्या नळ्या ह्या चाड्यापासून निघून जमिनीत रुतणाऱ्या फणापर्यंत असतात. या नळ्यांवाटे चाड्यात टाकलेले बियाचे दाणे जमिनीत पेरले जातात.


(१०) **पाम्हेर नाडानी दोरी :** तिफण नळ्या, चाडे दोरीने योग्य पद्धतीने बांधून पेरण्यायोग्य सज्ज करणे म्हणजे 'पाम्हेर नाडनं'. या नाडण्यासाठी जी दोरी वापरतात त्या दोरीला 'पाम्हेर नाडानी दोरी' 'किंवा' वरनदोरी असे म्हणतात. ही दोरी सुतापासून बनविलेली असून लांब असते.

(११) **इडं :** इडे. तिफणाचा फण जमिनीत रुतावा म्हणून त्याचे टोकावर कुसली ही चिमुकली पहार इड्याच्या साह्याने बसविलेली असते. ती कुसली बसविण्यासाठी वापरले जाणारे इडे.

(१२) **कुसली :** तिफणाचा फण जमिनीत रुतावा म्हणून त्याचे टोकावर कुसली ही चिमुकली पहार इड्याच्या साह्याने बसविलेली असते.

अनुक्रमणिका

# २३. कृषि - अवजारे (४)




अनुक्रमणिका

# २३. कृषि - अवजारे (४)

(१) **वख्खर किंवा डांख्या** : शेताची वखरटी किंवा कूळवणी करण्यासाठी वापरला जाणारा वखर. हा वखर जर मोठा असेल व त्याच्या साह्याने पेरणीपूर्व मशागत व पेरणीनंतर बी पुजविणयाचें काम केले जात असेल तर या आकाराने मोठ्या असणाऱ्या वखराला डांख्या असे म्हणतात. वखरापेक्षा डांख्याच्या लोडची लांबी हे जास्तीची असते.

(२) **लोड किंवा लोहोड** : वखर नांगर, तिफण यासारख्या कृषि अवजारांचा मुख्य भाग हा लोड असतो. लोड हे ओंडक्यापासून (जाड गोल लाकूड) बनवितात.

(३) **रुम्हनं** : रूमणे, वखर, कोळपे वा तिफण यांची हातात धरतात तो मूठ आणि मूठ बसविलेला लोड वरील उभ्या दांड्याचा भाग.

(४) **खरदांडी** : लोड या मुख्य भागातून निघून तिरकस अशी लांबदांडीवर असणारी एक दांडी. या दांडीमुळे लोड या मुख्य भागाजवळ एक त्रिकोण तयार होतो त्यावर वजनाचा दगड 'भरण' ठेवतात.

(५) **पास** : वखराचे जमिनीवर खेटून चालणाचे लांब लोखंडाचे पाते. हे पाते लोड खालील दोन दातांच्या टोकांवर फसविलेले असते. या पात्यामुळे जमिनीची माती, खालीवर उखरली जाते व गवत काढले जाते व गवत काढले जाते व जाड मातीची ढेकळे फुटून माती भुसभुशीत होते.

(६) **कोयपी** : कोळपे किंवा डवरा याची पास. वखराच्या पासप्रमाणे कोळप्यालाही चिमुकली पास असते. ती दोन पिकांच्या रांगामधील तृण काढून टाकते.

(७) **दाता किंवा दात** : वखर किंवा कोळपे यांच्या लोडच्या खाली असणारे दातासारखे भाग जे जमिनीवर खेटतात.

(८) **लांब दांडी किंवा दांडी** : औताची लांब दांडी जी लोड या मुख्य भागापासून ते जू पर्यंत लांब असते.

(९) **गोल्ही किंवा लांडगं किंवा जोड कोयपं**: कोळपे किंवा डवऱ्याचा एक प्रकार , या प्रकारात दोन कोळपे किंवा डवरे एकाच लोडावर बसविलेली असतात. त्यामुळे एकाच बैलजोडीच्या साह्याने एकच माणूस दुप्पट काम करू शकतो. मात्र ही गोल्ही किंवा लांडगं हे कोळपे पिके लहान असतानाच चालविणे शक्य असते दोन कोळप्यांमधील पिकांची रांग लोडपेक्षा उंच झाल्यास पिके मोडतात.

(१०) **कोयपं** : कोयपं किंवा डवरा हे पिकांच्या दोन रांगामधील जमिन भुसभुशीत करून तृण काढणारे आवजार, कोयपं, वखर आणि डांख्या यांची रचना सारखीच असते. मात्र आकार अनुक्रमे मोठा मोठा होत जातो.

अनुक्रमणिका

**(११) इडे :** इंडे. लोखंडाचे गोल इंडे. यांचा उपयोग औताचे दातांवरील पास बसविण्यासाठी होतो.


**(१२) भरन् :** वजन म्हणून ठेवला जाणारा दगड म्हणजे भरन्.

**(१३) मूट :** अवजाराचा मूठीत धरावयाचा भाग, वखर किंवा कोळपे यांचा रूमण्याचा धरावयाचा भाग.

**(१४) कुस्सू:** छिद्रात फसविण्यायोग्य केलेला निमुळता भाग छिद्रात फसण्यायोग्य असे टोक.

अनुक्रमणिका

## २४. कृषि - अवजारे (५)




अनुक्रमणिका

# २४. कृषि अवजारे (५)

(१) **कोयपं:** दोन पिकांच्या रांगेतील तृण काढणे व जमिनीची माती भूसभूशीत करणे यासाठी कुळवणी करतात.त्यासाठी कोयपं किंवा कोळपे (डवरा) हे अवजार वापरतात. याचा आकार चिमुकल्या वखरा सारखाच असतो.

(२) **गोल्ही किंवा लांडगं किंवा जोड कोयपं :** जोड कोळपे; एकाच लोडवर दोन कोळपे असतात. ते एकाच बैलजोडी आणि एकाच माणसाकरवी चालविले जातात. सामान्य कोळप्याहून याचा लोड दुप्पट लांबीचा असतो. या लांडग्याला चार दाते व त्यांना बसविलेल्या दोन कोयप्या असतात.

(३) **वख्खर :** वखर जमिनीची मशागत करण्यासाठी या अवजाराचा वापर होत असतो. याला जी पास असते ती जमिनीवर घासून जमिनीच्या थरांची माती खालीवर करते व तृणही काढते. मोठमोठी ढेकळे या वखाराने फुटतात. पेरणीपूर्वी शेताची वखरटी करतात.


(४) **पाम्हेर किंवा पांभर :** पाम्हेर म्हणजे तिफण, पेरण्यासाठी वापरली जाणारी तीन फण असणारी ती तिफण.

(५) **लाकड्या किंवा लाकड्या नांगर:** लाकडाचा नांगर, जमीन नांगरण्यासाठी नांगराचा उपयोग होतो.

अनुक्रमणिका

# २५. कृषि - अवजारे (६)

## (जू बांधण्याच्या पद्धती)




अनुक्रमणिका

# २५. कृषि - अवजारे (६)
## (जू बांधण्याच्या पद्धती)

**(१) दूस्सेर :** जू; बैलांना औताला किंवा गाडीला जुंपताना त्यांच्या मानेवर ठेवतात ती लांब दांडी म्हणजे जू किंवा दूस्सेर.

**(२) येलं :** जू ही औताला दोराच्या साह्याने बांधण्याऐवजी रबराची गोल मांडोळी अडकवून बांधतात. ही रबराची मांडोळी सायकलच्या टायरसारखी असते. वरून रबर व आतून असंख्य तारा असतात या रबराच्या मांडोळीला 'येलं' असे म्हणतात.

**(३) कोंडकं :** नांगराला वा वखराला जू बांधताना काही वेळा दोरी न वापरता कोंडकं मणी यांचा वापर होतो. कोंडकं व मणी लाकडापासून तयार केलेले असून या दोहोंना एका दोरीत ओवून त्यांचा गोल औताचे लांब दांडीत अडकवून मणीच्या दुसऱ्या छिद्राला त्या औताच्या नाडण्याचे (बांधण्याचे ) दोर बांधतात. कोंडक्याचा आकार मध्यभागी खोलगट असल्याने त्या भागात औताची दांडी सहज बसते.

**(४) तन्या :** बैलगाडीच्या कठड्याखालून ते साटलीच्या पुढील टोकावरील हाड्या वा माकोईपर्यंत खूप पीळ देऊन बांधलेला तार. कोणताही ताणून वा ओढून धरणारा तार वा दोरी.

**(५) दंडा किंवा साटली :** बैलगाडीच्या कठड्याखालील आखरीच्या दोन छिद्रांमध्ये ज्या दोन लांब दांड्या फसविलेल्या असतात. त्या मुख्य लांब दांड्या. यांनाच पुढच्या टोकावर जू बांधतात. याच दांड्यावरील फळीवर गाडी हाकणारा बसत असतो.

**(६) हाड्या :** बैलगाडीच्या जू आणि समोरचा भाग वरचेवर उचलून धरणारा. टेकू म्हणून काम करणारा बैलगाडीचा भाग.

**(७) माकोई :** बैलगाडीच्या जू बांधतात त्या जागी दोनही सराटीच्या खाली आठ ते दहा इंच लांबीचा नक्षीकाम केलेला आडवा (जूच्या समांतर ) एक लाकडाचा भाग असतो तो माकोई म्हणून ओळखला जातो.

**(८) नाडी :** बैलगाडीचा जू ज्या दोराने बांधतात तो दोर. या बांधण्याला 'नाडी नाडन' असे म्हणतात.

**(९) दांडी किंवा लामदांडी :** औताची लांब दांडी जी लोड या मुख्य भागापासून ते जू पर्यंत लांब असते.

**(१०) नाडी, दावं किंवा येठन्:** औताला जू येलं किंवा कोंडकं मणी यांनी अडकविल्यानंतर त्या येलं वा कोंडकंपासून औताच्या लोडपर्यंत बांधण्यासाठी वापरला जाणारा दोर.


अनुक्रमणिका

**(११) मनी :** मणी हा चापट लाकडाच्या फळीचा सहा ते दहा इंच लांबीचा तुकडा असून त्याच्या दोनही टोकावर दोन छिद्रे असतात. या छिद्रातून दोऱ्या ओवून परस्परविरुद्ध दिशेला ओढून बांधता येतात. असा मणी गाडीत वरपर्यंत चारा व ऊस भरतानाही वापरतात. तर औताला कोंडक्यासह किंवा कोंडक्याशिवाय वापरतात.

अनुक्रमणिका

# २६. कृषि - अवजारे (७)

## मोट



अनुक्रमणिका

# कृषि - अवजारे (७)
## (मोट - १)

**(१) धाव :** मोट ओढणारे बैल जेवढ्या जागेत मागे पुढे धावून विहिरीतून भरलेली मोट ओढून काढतात व रिकामी मोट परत मागे सरकत जाऊन विहिरीत सोडतात व शेताला पाणी पुरवठा करतात ती विहिरी लगतची उताराची जागा.

**(२) सोंदड :** खालच्या वडपावरील कना या चाकावरील सोंदड हे दोर. मोटेचे सोंडेचा भाग मोट रिकामी होऊ नये म्हणून ती मोटेच्या तोंडा बरोबरीच्या उंचीवरून खेचण्याचे कार्य सोंदड हे दोर करते.

**(३) नाडा :** वरच्या वडपाच्या चाकावरून नाडा हे जाड दोर पाण्याने भरलेल्या मोटेला वर ओढण्याचे काम करते.

**(४) पाटली :** मोट चालविणारा नाडा आणि सोंदड या दोनही दोरांवर ठेवलेल्या फळीवर बसून मोट हाकतो या फळीला पाटली असे म्हणतात. लाकडाची लहान पाटी / फळी म्हणजे पाटली.

**(५) खालेना वडपः** विहिरीच्या काठावरील मोटेसाठीच्या चौकटीचे खालचे जाड लाकूड .

**(६) वऱ्हेना वडप :** 'खलना वडप' या समांतर असणारे वरच्या बाजूचे लाकूड. खालचा व वरचा वडप मिळूनच मोटेसाठीची विहिरीच्या काठावरची चौकट बनते.

**(७) व्हड्या :** विहिरीच्या काठावरील तीर व वडप यांची चौकट विहिरीकडे झूकू नये. व हलू नये म्हणून त्या चौकटीला मागे खेचून ठेवणारे दोन्ही बाजूचे लाकडे वा दोऱ्यांचे ताणवे म्हणजे व्हड्या.

(८) **कानोडीः (११) कानोड्या :** मोटेचे चाक सहज फिरावे म्हणून ते ज्या विहिरीत झुकलेल्या दोन लाकडांच्या हातावर बसवितात ते चाक ठेवण्याचे लाकडी हात म्हणजे 'कानोड्या'. एक वचन कानोडी, अनेक वचन कानोड्या.

**(९) चाक :** मोटेला विहिरीतून वर खेचण्यासाठीचे वरच्या वडपावरील मोठे गोल चाक ज्याच्या खाचेत मोट ओढणारा नाडा हा जाड दोर सरकत असतो.

**(१०) कना :** मोटेचे खालचे टोकाला बांधलेला दोर 'सोदड' ज्या खालच्या वडपावरील लांबट अशा चाकावरून सरकतो ते लहान ओंडक्यासारखे चाक. याच्या दोन्ही बाजूंवर लोखंडाच्या गजांची टोके असतात.

**(११) थायनं :** धाव व खालना वडप या दोहोंमध्ये विहिरीच्या काठाला कमी खोल मात्र ऐसपैस पसरट असे पाण्यासाठीचे कूंड वा हाळ असते. यातच प्रथम पाण्याने भरलेली मोट रिकामी होत असते.

अनुक्रमणिका

**(१२) कुन्डं :** ज्या हौदात थायनं या मोठ्या पसरट हौदाचे पाणी जाते तो खोल व आकाराने लहान असणारा हौद 'कुन्ड' म्हणून ओळखला जातो, पाण्याचे कुन्ड.


**(१३) हेरः** विहिर

**(१४) आरन् किंवा आऱ्या :** मोटेच्या खालच्या लांबट असणाऱ्या चाकाचे (कनाचे) दोनही बाजूंचे लोखंडाच्या गजांची टोके जी कानोड्यावर सहज बसतात.

**(१५) तीर किंवा सूयाः** खालचा व वरचा वडप या परस्परांना समांतर असणाऱ्या जाड लाकडांना जोडणारे, उभे असणारे जाड लाकडांचे भाग. या उजव्या बाजूच्या व डाव्या बाजूच्या तिरांना अनुक्रमे जेवना तिर आणि डावा तिर असे म्हणतात.दोन तिर व दोन वडप मिळून पूर्ण चौकट बनते. ती विहिरीच्या काठावर असते.

अनुक्रमणिका

# २७. कृषि - अवजारे (८)
## (मोट–२ )




अनुक्रमणिका

# २७. कृषि - अवजारे (८)
## (मोट—२)

**(१) मोट :** शेतीला पाणी पुरवठा करण्याचे एक जुने साधन. यात चामड्याची मोठी पिशवी बैलांच्या साह्याने विहिरीत सोडून ती पाण्याने भरून बैलांकडून वर खेचून शेतीला पाणीपुरवठा केला जात असे. मोट या मोठ्या चामडी पिशवीचा विशिष्ट आकाराची असते. ही चामड्याची पिशवी वर पसरट गोलाकार असते. तर खाली लांबट असा आकार असून दोनही तोंडे मोकळी असतात. इंग्रजी यू या अक्षराप्रमाणे या मोटेचा आकार बनत असल्याने तिच्यात पाणी भरलेलेच राहते.

**(२) नाडा:** वरच्या वडपाच्या चाकावरून नाडा हे जाड दोर पाण्याने भरलेल्या मोटेला वर ओढण्याचे काम करते.

**(३) सोंदड :** खालच्या वडपावरील कना या चाकावरील सोंदड हे दोर मोटेच्या सोंडेचा भाग मोट रिकामी होऊ नये म्हणून ती मोटेच्या तोंडाच्या बरोबरीच्या उंचीवरून खेचण्याचे कार्य करते.

**(४) सोंड:** मोटेचे खालचे तोंड जे पाणी 'थाळणे' या मोठ्या पसरट हौदात सोडते व मोट रिकामी होते.

**(५) डेरा :** चामडी मोटेचा मधला डेऱ्याचा भाग.

**(६) जासोड, जासूद किंवा जासोद :** मोटेचा वरचा भाग गोलाकार अशा मांडोळी भोवती शिवून तयार केलेला असतो. ही मांडोळी गणितातील अधिकच्या खुणेसारख्या लाकडाच्या चारही टोकांवर असते.या अधिकच्या खुणेसारखी लाकडाची रचना 'जासोद वा जासोड' म्हणून ओळखली जाते. बुड्या या वजनामुळे मोटेचे तोंड तिरपे होऊन मोटेच्या या तोंडातून पाणी आत जाऊन ती भरते.

**(७) बुड्या :** विहिरीत मोट गेल्यानंतर ती पाण्यात बुडावी म्हणून त्या मोटेच्या गोलाकार तोंडाच्या एका कडेवर वजन बांधलेले असते या वजनाला 'बुड्या' असे म्हणतात.

**(८) कडं :** मोटेचे तोंड ज्या गोल मांडोळीच्या कडांना शिवलेले असते ती मांडळी 'कडं' म्हणून ओळखली जाते.

**(९) लाखनदोरी :** मोटेचा चामड्याची पिशवीवजा भांगाचे तोंड, कडं या गोल मांडोळीवर शिवण्यासाठी जी दोरी वापरतात त्या दोरीला ‘लाखनदोरी’ असे म्हणतात.

**(१०) जूवाड किंवा जिवाल्डी :** मोटेसाठी वापरली जाणारी विशिष्ट प्रकारची जू. या जू मध्ये बैलांची मान ही चौकटीत बंद होते. या जिवाड वा जूवाडचा आकार हा आयताकृती असतो. यामध्ये बैलांच्या माना फसविल्या जातात.ही जू साधारण जू पेक्षा वेगळी असते. दोन जू समांतर पद्धतीने परस्परांना जोडून तयार केल्यासारखी ही जूवाड दिसते. वरचे लाकूड हे दूस्सेर तर त्या समांतर असणारे खालचे लाकूड हे 'पात' म्हणून ओळखले जाते.

अनुक्रमणिका

**(११) शिव्वय किंवा शिव्वळ :** साध्या जू प्रमाणे दोन टोकावरील छिद्रात खोसली जाणारी इंग्रजी वाय आकाराची काडी. येथे मात्र ही शिव्वयवरच्या 'दूस्सेरच्या' छिद्रातून निघून 'पातच्या' छिद्रात फसेल एवढी लांब असते.


**(१२) छगन्या :** या जूवाडचे वरचे जू व खालचे पातं ही दोन परस्पर समांतर लाकडे 'छगण्या' या उभ्या दोन दांड्यांनी परस्परांना जोडलेले असतात.

**(१३) कना :** मोटचे खालचे टोकाला बांधलेले दोर 'सोदड' ज्या खालच्या वडपावरील लांबट अशा चाकावरून सरकतो ते लहान ओंडक्यासारखे चाक. याच्या दोनही बाजूंवर लोखंडाच्या गजांची टोके असतात. जी कानोड्यांवर टेकतात.

**(१४) आरन किंवा आऱ्या :** कना या चाकाच्या दोनही बाजूंची लोखंडाच्या गजाची टोके.

**(१५) चाक :** मोटेचे चाक हे वरच्या वडपवर असते.

# २८. कृषि - अवजारे (९)




अनुक्रमणिका

## २८. कृषि - अवजारे (९)

**(१) पावडी :** पावडी हे जाड पत्र्याचे माती खोदून ओढण्याचे एक अवजार. यास माती ओढण्यासाठी एक पाते असून त्या पात्याच्या वरच्या बाजूस गोल भाग असतो त्याला लाकडाचा लांब दांडा फसविला जातो; फावडे

**(२) कुदई किंवा कुदयी :** खोदण्याच्या उपयोगात पडणारे एक अवजार. चापट असे जाड टोकदार लोखंडाचे पाते असून लाकडाचा दांडा असतो; कुदळी.

**(३) टिक्कम :** टिकाव; जमीन खोदण्याचे एक अवजार; या अवजारास दोनही बाजूंनी लोखंडाची टोकदार पाती असतात व मध्यभागी  लोखंडाचा दांडा असतो.

**(४) पाटी, घमेल, घमीलं किंवा टोपली:** लोखंडाचे टापले, या टोपल्याचा उपयोग खोदलेली माती भरून बाजूला टाकण्यासाठी करतात. कोणतीही वस्तू वा माल या घमेल्यात ठेवता येतो. याचा आकार अर्धगोल असल्याने वरचा तोंडाचा भाग खूप पसरट असतो त्यामुळे गुरांना पाणीही या घमेल्यात टाकून पाजता येते.

**(५) कुऱ्हाड :** लाकडे फोडण्यासाठी वा झाडे तोडण्यासाठी वापरली जाणारी लोखंडाची कुऱ्हाड.

**(६) दांडा किंवा दांड :** कुऱ्हाड, पावडी कुदई किंवा टिक्कम या अवजारांचा लाकडाचा दांडा.

**(७) बरछी कुऱ्हाड किंवा फरशी कुऱ्हाड :** कुऱ्हाडीचा एक प्रकार; या कुऱ्हाडीचे पाते हे अर्धगोलाकार असते.

**(८) वाकडी कुदयी** : किंचित बाक असलेली कुदळी; अशा प्रकारच्या कुदळीने केळींच्या वाफ्यांची टाचणी करतात. सलग वाकून जमिनीचा वरचा थर खोदण्याचे काम करणे या कुदळीने सोपे जाते.

**(९) पान :** पाने म्हणजे पाते. कोणत्याही अवजाराचे लांबट पण समोरच्या बाजूस धारदारपणा आणता येणारे पाते. (विळा, विळी, फावडे-कुदळी वा टिकाव यांचे पाते.)

**(१०) मुंदन :** जेथे लाकडाचा दांडा फसविला जातो तो कुऱ्हाड वा फावडे यांचा पात्याच्या वरचा गोल भाग.

**(११) चापन किंवा गया :** जेथे दांडा फसवितात तो गोल भाग आणि पाते यांच्या मधला ( पात्याहून जाड असणारा विशिष्ट प्रकारचा बाक देऊन पात्याची दिशा बदलणारा ) कुऱ्हाडीचा भाग.

**(१२) पहार किंवा सब्बल :** लांब असा लोखंडाचा (टोकावर चापट असे टोक असणारा) दांडा. ज्याचा उपयोग अरूंद खड्डा खोदण्यासाठी व जामिनीला छिद्रे पाडण्यासाठी करतात; लोखंडाची पहार.

अनुक्रमणिका

## २९. कृषि - अवजारे (१०)




अनुक्रमणिका

# २९. कृषि - अवजारे (१०)

(१) **चाहूर किंवा च्याहूर :** धान्य उफणतांना उंचावर उभे राहण्यासाठी वापरली जाणारी उंच पाय असणारी तीन पायांची तिपाई. या तिपाईवर उभे राहून हवेत धान्य उफणून साफ करतात.

(२) **शेम्पडं किंवा शेनकूर :** काड्यापासून तयार केलेले मध्यम आकाराचे टोपले जे काडी कचरा व शेण भरून फेकण्यासाठी वापरले जाते.

(३) **उपन्ती किंवा उपन पाटी :** धान्य उफणण्यासाठी वापरली जाणारी लोखंडाची टोपली.

(४) **खट्टा :** तुरीच्या काड्यांपासून तयार केलेला खराटा.

(५) **बोखरी :** विशिष्ट प्रकारच्या गवताच्या लांब काड्यांपासून तयार केलेला खराटा. ज्याचा उपयोग मळणीचे वेळी धान्याच्या ढिगांवरून या खराट्याने झाडून त्यातील बोंड आणि काडी कचरा काढण्यासाठी होती.


(६) **मोगरी :** कणसे कांडण्याची लाकडाची मोगरी. मोगरी दिसायला ही एक बाजू चापट असणारा व टोकावर हाती धरायला मूठ असणारा लाकडाचा दिड ते दोन फूट लांबीचा तुकडा असतो.

(७) **पावडा :** दाताळं; कणसे पसरविणे वा गोळा करणे यासाठी वापरले जाणारे दातेरी फावडे

(८) **शिंगाडं :** कणसे काढण्यासाठी वापरले जाणारे लांब लाकडी दांडे; कणसे कुटण्याच्या झोड्या किंवा धोपट्या.

अनुक्रमणिका

## ३०. जनावरांशी संबंधित वस्तू




अनुक्रमणिका

## ३०. जनावरांशी संबंधित वस्तू

**(१) गव्हान :** गुरांना जेथे चारा टाकतात ती त्यांच्या खुंट्याजवळची जागा. खुंटा आणि चारा यामध्ये जाड लाकूड ठेवलेले आढळते त्यामुळे चारा गुरांच्या पायाखाली येऊन खराब होत नाही. काही शेतकरी ही गव्हाण बांधून घेतात.

**(२) बेडी :** कोणतेही जनावर खूप वेळा पळून जात असेल व हाती लागत नसेल तर त्यास धावता येऊ नये म्हणून त्याच्या एका पायाच्या खुरेवर इंग्रजी वाय अशा अक्षरासारखी काडी अडकवून बांधतात. त्यामुळे त्या जनावरास धावता येत नाही.

**(३) लोंढनं :** लोंढणे; जनावर खूप पळू नये म्हणून त्याच्या गळ्यात लांब असा लाकडाचा दांडा बांधतात. तो दांडा समोरच्या दोनही पायांच्यामध्ये असल्याने त्यास पळण्यास अडथळा निर्माण होतो.

**(४) खूटा :** गुरांना बांधावयाचा खूंटा. गुरांना बांधण्यासाठी जमिनीत लाकडाचा दांडा रोवलेला असतो तो खूंटा.

**(५) बिल्डं :** खुट्याला बांधताना बकऱ्यांच्या वा लहान गुरांच्या गळ्यात अडकवितात तो दोरीचा गळ्याच्या मापाचा गोल.

**(६) खूटदावं किंवा खूटदोर :** जनावरांना खुंट्याला ज्या दोराने बांधतात तो दोर.

**(७) शेम्पडं, शेनपड किंवा शेनकूर :** काड्यांपासून विणलेले मोठे टोपले. शेण भरून उकिरड्यावर फेकण्यासाठी वापरतात ते काड्यांपासून विणलेले टोपले.

**(८) खट्टा :** काड्यांपासून तयार केलेला खराटा. या खराट्याचे साह्याने अंगण, गोठा वा धान्य तयार करावयाचे खळे झाडतात.

**(९) कुऱ्हाड :** लाकडे फोडायाची वा झाडे तोडावयाची कुऱ्हाड.

**(१०) ठेमडं वा चारा तोडानं लाकूडं :** गुरांना कडबा वा इतर चारा कुऱ्हाडीने तोडून टाकतात. त्या चारा तोडण्यासाठी खाली जो लाकडाचा मोठा ठोकळा वापरतात तो बुंध्यासारखा ठोकळा.

**(११) दुस्सेर :** बैलगाडीची वा औताची जू.

**(१२) जिवाल्डी :** नांगरटीसाठी वा मोटेने विहिरीतून शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी वापरली जाणारी विशिष्ट प्रकारची आयाताकृती जू.

**(१३) छगन्या :** जिवाल्डी या आयताकृती जूच्या उभ्या दांड्या. ज्याचे मूळे बैल परस्परांजवळ येऊ शकत नाहीत. व बाहेरच्या बाजूने शिवळा असल्याने त्यांना बाहेरही मान काढता येत नाही.


अनुक्रमणिका

(१४) **शिव्वय** : जू वा जिवाल्डीमध्ये टोकांवरील छिद्रात फसविली जाणारी इंग्रजी 'वाय' अक्षराच्या आकाराची काडी; या शिव्वळमुळे बैलाला जूंपलेले असताना मान काढून घेता येत नाही.

(१५) **पेन्ढी** : चाऱ्याची किंवा कडब्याची गड्डी, पेन्ढी.

अनुक्रमणिका

## ३१. जनावरांचे अवयव आणि साज




अनुक्रमणिका

## ३१. जनावरांचे अवयव आणि साज

(१) **बैल, बईल किंवा गोऱ्हा** : बैल; वयाने कमी असणाऱ्या बैलाला गोऱ्हा असे म्हणतात.

(२) **शिंग किंवा सिंग** : गाय, बैल व म्हैस यासारख्या जनावरांचे शिंग.

(३) **खांदा** : खांद्याचा भाग, खांदा.

(४) **पाट्** : पाठ किंवा पाठीचा भाग.

(५) **मांडी किंवा फर्रे** : जनावरांचा पायाचा वरचा मांडीचा भाग.

(६) **पाय किंवा तंगडी** : पाय, पायाचा भाग.

(७) **शेप किंवा शेपूट** : जनावरांचा शेपटीचा भाग.

(८) **गोडा किंवा शेपना गोंडा** : शेपटीच्या टोकावरील केसाळ गोंडा; शेपटीचा केसाळ असा टोकाचा भाग.

(९) **आन्ड किंवा आन्डखोया** : वृषण; बैलाचे वा नर प्राण्याचे वृषण.

(१०) **शेम्नं किंवा मुतानी जागा** : बैलाचा वा नर प्राण्याचा मूत्र विसर्जनचा मार्ग वा संभोग अवयव.

(११) **कान** : कान हा अवयव, श्रवणेंद्रिये.

(१२) **गोंडा** : बैलाच्या कपाळावर बांधला जाणारा झुपकेदार गोंडा जो सूत, सन केकती वा ताग यासारख्या तंतूपासून बनविलेला असतो.

(१३) **घंटी** : बैलाच्या गळ्यात बांधला जाणारा लहान घंटा. बैलांच्या गळ्यांतील हा घंटा बैलांच्या हालचालीनुसार सतत हलत असतो.

(१४) **घंटा** :बैलांच्या गळ्यातील मोठा घंटा. घंटीपेक्षा घंटा हा मोठा असतो.

(१५) **घोगर** : गुरांच्या गळ्यात बांधावयाची विशिष्ट प्रकारचा घंटा. या घंट्याचा आकार घुंगरासारखा संपूर्ण गोल व त्याला भेग असणारा असतो. तो धातूंचा मोठा असा ओतीव घुंगरू असतो, त्याच्या आतील खडा हा सतत वाजत राहतो.

(१६) **केसारी** : केसांपासून विणलेली दोरी.

अनुक्रमणिका

**(१७) मुस्कं :** औताच्या वा कामावरील बैलाने उभे पीक खाऊ नये म्हणून त्यांचे तोंडास बांधावयाची जाळी.

**(१८) झूल :** बैलांच्या पाठीवर साज म्हणून पांघरलेले नक्षीकाम केलेले कापड.

**(१९) टोका किंवा इंदरखूर :** बैलाच्या खूरेच्या वर मागच्या बाजूस असणारा बोटांसारखा लांबोळा भाग.

**(२०) खूर :** खूर, जनावरांची खूर

**(२१) पोट :** पोटाचा भाग, पोट

**(२२) पोयी किंवा पोई :** जनावरांच्या जबड्यापासून पायांलगतचा माने खालचा झूलणारा भाग.


**(२३) डोया :** डोळा.

**(२४) शामी किंवा शेमी :** बैलांच्या शिंगावर बसवितात ती धातूची टोकदार टोपी

**(२५) नाथ, नाथी किंवा नात् :** जनावरांचे वेसन. जनावरांना नियंत्रिण ठेवता यावे म्हणून त्यांच्या दोनही नाकपुडीतून आरपार छिद्रे पाडून त्यात दोरी ओवतात व ती शिंगाच्या मागे डोक्यावर गाठ मारून बांधतात. त्या दोरीला ओढताच नाकपुड्या ओढल्या गेल्याने जनावर संपूर्ण नियंत्रणात राहते.

अनुक्रमणिका

# ३२. आंब्याची फळे तोडणे




अनुक्रमणिका

## ३२. आंब्याची फळे तोडणे

(१) **बेन्नी, बेडनी किंवा खुडे :** आंबे तोडण्यासाठी वापरला जाणारा झेला ज्याचे जाळीला लांब असा बांबू लावलेले असतो.

(२) **टोकर :** बांबू.

(३) **मांडोयी किंवा कडं :** मोडोळी; तारेचा गोल.

(४) **पट्टी :** आंब्यांना बेन्नी लावून त्या जाळीत आंबे देठापासून तुटून पडावेत म्हणून त्या जाळीत बसविलेल्या तिरकस पट्ट्या.

(५) **जाई :** जाळी , दोऱ्यांनी विणून तयार केलेली जाळी.

(६) **कैऱ्ही :** कच्चा आंबा.

(७) **घस, घोस किंवा कैऱ्हीस्ना घसः** एकाच देठावरील अनेक कैऱ्या. कैऱ्यांचा घड.

(८) **झेल्तं किंवा झेला :** आंबे भरण्यासाठी वापरतात ती दोरीपासून तयार केलेली मोठ्या पिशवीसारखी जाळी; झेला.


(९) **पोतं :** पोते किंवा खाली बारदान.

(१०) **आवते, चऱ्हाट किंवा दावं :** दोर किंवा चऱ्हाट.

(११) **तगारी, कढाय, पाटी किंवा टोपली :** टोपली, धातूची टोपली.

अनुक्रमणिका

# ३३. सुताराची अवजारे




अनुक्रमणिका

## ३३. सुताराची अवजारे

(१) **रंधा :** लाकडाला गुळगुळीत करावयाचे सुताराचे एक अवजार, रंधा.

(२) **पटाशी किंवा पटासी :** लाकडाची मूठ असणारे हव्या त्या ठिकाणी लाकडाला कोरून काढण्यासाठी वापरले जाणारे पोलादाचे पाते. या पात्याने लाकूड कोरताना पटाशी कोरावयाच्या जागेवर उभी धरून हातोडी किंवा वासलं यांच्या साह्याने ठोकतात.

(३) **किकरं :** पटासीपेक्षा रुंदीला कमी पाते असणारे, लाकडाचा लहान छिद्र्यासारखा भाग कोरून काढण्यासाठी वापरले जाणारे  अवजार.

(४) **हातोडी :** खिळे ठोकण्यासाठी वापरतात ती हातोडी.जी हातोड्यापेक्षा आकाराने लहान असते.

(५) **गुन्या :** सुताराचा गुण्या; गुण्या या अवजारात दोन पट्ट्या नव्वद अंशाचा कोन करून परस्परांना जोडलेल्या असतात, या पट्ट्यावर इंच सेन्टीमिटरच्या खुणाही असतात.

(६) **करबत किंवा कर्बत :** लाकडे वा झाडे कापावयाची करवत.

(७) **गिरमिट :** लाकडाला छिद्रे पाडण्याचे पीळ असणारे टोकदार असे अवजार ज्याचे साह्याने ते स्क्रूसारखे फिरवून लाकडाला छिद्र पाडता येते.

(८) **शार :** लाकडाला छिद्रे पाडण्याचे सुताराचे एक अवजार. यात उभ्या दांड्याला टोकावर टोकदार पाते बसविलेले असून तो दांडा जेथे छिद्र पाडावयाचे तेथे ठेवून त्यास दोरी गुंडाळून तिची दोनही टोके मागेपुढे ओढून छिद्रे पाडले जाते. दोरी मागेपुढे ओढल्याने दांड्याचे स्वतःभोवती वेगाने फिरणे होऊन छिद्रे पडते.

(९) **वासलं किंवा वाकस :** सुताराची विशिष्ट प्रकारची कुऱ्हाड, या अवजाराचे पाते दांड्याच्या दिशेने वाकलेले असते या अवजाराने सुतार लाकडाचे पापुद्रे काढून त्याला हवा तसा आकार देत असतो याचा उपयोग लाकडाला तोडण्याऐवजी त्याला शिलण्यासाठी किंवा शाळण्यासाठी होतो. सुतार या वासल्याच्या सह्याने लोणच्याच्या कैऱ्याही फोडून देत असतो.

(१०) **भिडं :** सुताराचा काम करताना त्या लाकडाला घट्ट फसवून ठेवणारा चिमटा किंवा जॉ. हा संपूर्ण लोखंडाचा असतो . लाकडाच्या जाडीनुसार हा जबडा मागेपुढे करता येण्यासाठीची व लाकूड घट्ट बसविण्याची सोय असते;  शेगडा.

(११) **फिनफिन :** पॅनलचे दरवाजे बनविताना सुतार फिनफिन हे अवजार वापरतो. या अवजारात दोन फळ्यांचे तुकडे परस्परांना समांतर राहून मागेपुढे होऊ शकतील अशी व्यवस्था त्यांना जोडलेल्या दोन


लहान दांड्याचे साह्याने केलेली असते. ह्या दोनही दांड्यांमधून मागेपुढे सरकू शकणाऱ्या फळीच्या टोकावर टोकदार खिळा असतो. त्याला आरी किंवा काटा असे म्हणतात.

(१२) **खतावनी :** फळीच्या कडेच्या समांतर पण कडेपासून वेगवेगळ्या अंतरावर रेषा कोरून काढण्यासाठी खतावनी हे अवजार वापरतात. खतावनी या अवजारात लोड नामक चौकोनी फळीच्या तुकड्याला मागेपुढे सरकू शकणाऱ्या दोन दांड्या दोन छिद्रांत असतात. त्या दांड्यांच्या टोकावरील टोकदार खिळ्याने खाचा पडतात.

(१३) **खसरा :** फळी किंवा लाकडाच्या कडेवर कडेला समांतर अशी खाच पाडण्यासाठी हे आवजार वापरले जाते. हे त्या फळीच्या कडेवर ठेवून खाच पडेपर्यंत घासतात. ती रेषा अवजाराच्याच खाचेमुळे समांतरच पडते.

अनुक्रमणिका

# ३४. चांभाराची अवजारे (१)




अनुक्रमणिका

# ३४. चांभाराची अवजारे (१)

(१/३) **आरी** : चांभाराचे चामडे शिवण्याच्या कामी येणारे अवजार. या आऱ्या दोन, तीन प्रकारच्या असतात. चामड्याला छिद्र पाडता येऊन त्यातून दोरा ओढून घेता यावा अशा प्रकारची टोकावर दोरा अडकविण्यास खाच असलेली आरी शिवण्यासाठी वापरली जाते. अशा आरीला **कत्यारी** वा **कत्त्यारीनी आरी** असे म्हणतात. कामानुसार वा पाडावयाच्या छिद्राच्या आकारानुसार या आरींचे टोकांचे आकार आढळतात. मागे लाकडाची मूठ असते.

(२) **आरन्** : आरन् म्हणजे ऐरण. या ऐरणीवर चांभार चामडे वा जोडे ठेवून त्यावर हास्तीने ठोकतो. चामड्याला कापताना, खिळा ठोकताना, त्या चामड्याला मऊ करताना दरवेळी चांभार या ऐरणीचा अपयोग करीत असतो.

(४) **रापी** : चामड्याला कापण्यासाठी रापी या तीक्ष्ण पाते असलेल्या अवजाराचा वापर करतात. या रापीचे पाते हे अर्धचंद्रकार वा विविध आकारांचे आढळतो. मागे लाकडी मूठ असते.

(५) **हास्ती** : हास्ती म्हणजे चांभाराचा हातोडाच. मात्र हास्तीचा आकार घरातील मुसळीसारखा असतो. ही संपूर्ण लोखंडाची असते. समोरचे टोक हे थोडे पसरट चापट व जाड असते. त्या पसरट टोकाने चामड्यावर हास्तीने घाव घालून खिळे ठोकता येतात.

(६) **फरांडी** : फरांडी हा चापट लाकडी ठोकळा ज्याचेवर कारागीर चामडे ठेवून रापीने योग्य हवे तसे कापतो. या लाकडाच्या फरांडीमुळे रापीसारख्या शस्त्राची धार बोथट होत नाही.

(७) **आंबूर** : आंबूर म्हणजे चांभाराचा खिळे उपटून काढावयाचा चिमटाच. या आंबूराचा आकार पकड वा सांडस सारखा असतो. समोरचा तोंडाचा भाग हा साधारणतः गोलाकार असतो.


(८) **डबा किंवा डबड** : चांभाराला वेळोवेळी चामडे भिजवून त्याला आकार देण्याचे वा कापण्याचे काम करावे लागते. जो चांभार गावोगाव फिरून आपला व्यवसाय करतो तो पाणी ठेवण्यासाठी असा डबा, डबड सोबत घेऊन फिरतो. मात्र जेथे तो नेहमी कामासाठी बसत असतो त्या त्याच्या काम करावयाच्या ठिकाणी मोठी दगडाची कुंडी पाणी ठेवण्यासाठी ठेवलेली असते. अशा कुंडीस '**चम्हार कुंड**' असे म्हणतात.

(९) **डबी** : पॉलिशची डबी.

(१०) **बरस** : बरस म्हणजे ब्रश. चपला जोडे यांना पॉलीश करण्यासाठी ब्रश वापरला जातो.

(११) **टरंग किंवा पेटी** : चांभार आपली सर्व अवजारे एका पेटीत घेऊन गावोगाव फिरत असतो. तो ज्या पेटीत ही सर्व अवजारे ठेवतो तीला टरंग असे म्हणतात. पेटीऐवजी जाड कापडाची वा चामड्याची पिशवी देखील वापरतात अशा पिशवीला **खलता** असेही म्हणतात.

## ३५. चांभाराची अवजारे (२)




अनुक्रमणिका

## ३५. चांभाराची अवजारे (२)

(१) **ठोकर :** बुटांच्या तळव्याला समोरच्या भागाला ठोकावयाच्या धातूच्या पट्ट्या.

(२) **नाल :** टाचेखाली येणाऱ्या बुटाच्या तळव्याच्या भागाला ठोकावयाच्या धातूच्या अर्धगोल पट्ट्या.

(३) **जोडं :** जोडं म्हणजे बूट वा जोडा (जोडं म्हणजे जोडा किंवा बूट मात्र जोड् म्हणजे जोडी किंवा दोन नग.)

(४) **चप्पल, वावन किंवा वाव्हन :** पायात घालावयाच्या चपला.

(५) **धनगरी जोडा :** जोड्याचा एक प्रकार, असल्या प्रकारचे जोडे विशेषत्वे धनगर लोक वापरतात.

(६) **कलबूत :** ज्या लाकडाच्या साच्यावर चामडे जोड्याचा आकार आणून ठोकले जाते व जोडे बनविले जातात तो लाकडाच्या जोड्याच्या आकाराचा साचा.

(७) **आकोडी :** चांभाराचे एक आकड्यासारखे वाकविलेले जाड तारेचे एक अवजार.

(८) **फिट्टाप् पकड :** चांभार जोडे तयार करतांना जी विशिष्ट प्रकारची पकड वापरतो ती पकड. ह्या पकडीचे समोरचे तोंड हे चामडे ओढून ताणता येईल अशा प्रकारचे असते तर मागचे टोक दांड्यांना चामड्यात चुकून ठोकलेला वा जुन्या जोड्यात ठोकलेला खिळा उपटण्यासाठी वापरता येईल असे किंचित दुभंगलेली खाच असणारे असते.

(९) **कत्यारी, कट्यारी किंवा कट्यारीनी आरी :** जोडे चपला शिवताना चामड्याला छिद्र करून त्यातून दोरा ओढता येवू शकेल अशा प्रकारची मूठ असणारी चामडे शिवण्याची सुई.

(१०) **आरी :** चामडे शिवताना त्याला छिद्रे पाडण्यासाठी वापरले जाणारे मूठ असणारे व टोकदार असे त्रिकोणी पाते असणारे एक अवजार.

(११) **रापी :** चामडे कापावयाचे, अर्धगोल असे तिक्ष्ण पाते असणारे एक अवजार या अवजारालाही लाकडाची मूठ असते.

(१२) **आरन् :** चांभाराची ऐरण. चांभार ज्या ऐरणीवर जोडे वा चामडे ठेवून त्यांना खिळे मारतो ती ऐरण. ह्या ऐरणीचा आकार तीन भाग परस्परांना नव्वद अंशाचा कोण करून एकाच ठिकाणी मिळतील असा आणि या तीनही भागांचे दुसरे टोक हे चामडे ठेवता यावे म्हणून चापट व किंचित लांबट व गोल असते. ही ऐरण जमिनीवर सहज न हलता बसू शकते तिला जमिनीत रुतविण्याची गरज नसते.

अनुक्रमणिका

**(१३) हास्ती :** चांभार, चामडे वा चामड्याची वस्तू ऐरणीवर ठेवून ज्या मुसळीसारख्या हातोडीने ठोकतो ती लोखंडाची दांड्यासारखी मुसळ.

**(१४) एखलाई :** तीन भाग असणाऱ्या ऐरणीऐवजी काही वेळाच चांभार एकच पाय असणारी ऐरणी वापरतात. ती ऐरण म्हणजे निव्वळ साधारणतः पंचेचाळीस अंशाचा कोनात वरचा भाग वाकलेली जाड लोखंडी पट्टी असून दुसरे टोक जमिनीत रुतावे म्हणून टोकदार असते. वरच्या चापट भागावर चांभार चामडे ठेवून खिळे ठोकतो.

**(१५) पाल्हकनी :** रापीसारख्या तिक्ष्ण अवजाराला घासून धार देण्यासाठी वापरावयाचा विशिष्ट प्रकारचा गुळगुळीत दगड.

**(१६) फरांडी :** ज्या लाकडी ठोकळ्यावर वा फळीच्या तुकड्यावर चामडे ठेवून चांभार आरीने ते हवे तसे कापतो तो लाकडी ठोकळा किंवा फळी.

**(१७) पट्टा :** चपलेचा पट्ट्याचा भाग.


**(१८) आंघोटा :** पायाचा अंगठा जेथे असतो तो चपलेचा भाग.

**(१९) टाक किंवा टाच :** चप्पल वा जोडा यांचा टाचेचा भाग.

**(२०) नाथी :** चामड्याचा बारीक दोरीवजा भाग वा पट्टी. अशी पट्टी साधारणतः चपलेच्या अंगठा ते पट्टा यांना जोडते.

अनुक्रमणिका

## ३६. न्हाव्याची अवजारे



अनुक्रमणिका

# ३६. न्हाव्याची अवजारे

**(१) वाटी किंवा पानीनी वाटी :** न्हावी कटिंग करणाराचे डोक्याला व दाढीला पाणी लावीत असतो. ते पाणी ठेवण्यासाठी वापरावयाची वाटी.

**(२) बरस :** ब्रश. ब्रश परिचित होण्यापूर्वी पाणी व साबण लावून न्हावी हातानेच मालीश करून दाढी करत असे.

**(३) कंगा किंवा कंगवा :** कंगवा.

**(४) पाल्हकनी :** वस्तऱ्याची धार तेज करण्यासाठी ज्या विशिष्ट प्रकारच्या दगडावर त्याला घासतात तो दगड.

**(५) कयची :** केस कापावयाची कैची.

**(६) वस्तारा :** तीक्ष्ण पाते असणारे, खरडून केस काढण्यासाठी वापरले जाणारे न्हाव्याचे एक अवजार या पात्याला लाकडाची वा धातूची मूठ असते; वस्तरा.

**(७) नऱ्हानी :** न्हावी ज्या शस्त्राने नखे काढून देतो ते जाड तारे सारखे टोकाला तीक्ष्ण पाते असणारे शस्त्र.


**(८) मिसिन किंवा मशीन :** केस कापावयाचे यंत्र. याचा आकार पकड सारख्या दोन दांड्या असणाऱ्या आणि मोठ्या आगपेटी एवढा असतो. दोन्ही दांड्या परस्परांपासून दूर जाव्यात म्हणून आत स्प्रिंग असतो.

**(९) साबू किंवा साबूनी वडी :** साबण किंवा साबणाची वडी.

**(१०) कोय किंवा कोहोय :** डोक्यातील कोंडा आंब्याच्या अर्ध्या कोयीच्या कवचाने घासतात.अशी अर्धी कोय न्हावी आपल्या **धोपटीत** (न्हावी ज्या पेटीत वा पिशवीत आपली सर्व अवजारे ठेवतो ती पेटी वा पिशवी.) नेहमी बाळगत असे.

अनुक्रमणिका

## ३७. लोहाराची अवजारे




अनुक्रमणिका

## ३७. लोहाराची अवजारे

**(१) आरन् :** ऐरण. ज्याचेवर लोहार तप्त धातूची वस्तू ठेवून तीला योग्य तो आकार देण्यासाठी वरून घणाने घाव घालतो ती लोखंडाची ऐरण.

**(२) धमन किंवा भाता :** लोहाराची भट्टी प्रज्वलीत करण्यासाठी हवा घालणारा मोठा चामड्याच्या आडव्या पिशवीसारखा भाता.

**(३) दांडी :** लांब बांबूची दांडी.

**(४) तीर किंवा चौखट :** चामड्याचा हा भाता ज्या चौकटीत असतो त्या चौकटीच्या दोन उभ्या दांड्या.

**(५) भाता :** लोहाराच्या भात्याचा मुख्य भाग.

**(६) धुकान :** या भात्याची हवा जेथून निघते व जेथे प्रज्वलीत निखारा असतो ती भात्याची नळी व ती जागा.

**(७) आकोडा :** अडकविण्यासाठीचा आकडा किंवा हूक.

**(८) वजन :** दोरी सोडताच भात्याची पिशवी बंद व्हावी व हवा बाहेर सोडली जावी म्हणून त्या भात्याला मागच्या बाजूला टांगलेला वजनदार दगड वा लोखंडाचा तुकडा .

**(९) कानस :** घासावयाची कानस; खरबरीत अशी पोलादाची पट्टी जिच्या साह्याने घासून धातूला योग्य असा आकार देतात.

**(१०) घन :** मोठा हातोडा; घण.

**(११) हातोडा :** हातोडा.

**(१२) छन्नी किंवा छिनी :** छिन्नी. पाते असणारे जाड खिळ्यासारखे अवजार. ते ठेवून त्याच्यावर घाव घालून लोखंडाचा तुकडाही काढता येतो.

**(१३) हातोडी :** हातोडी.

**(१४) सांडस् :** पकड; वस्तू पकडता येईल असे एक साधन.

अनुक्रमणिका


**(१५) तीर :** चामड्याच्या भात्याचे चामडी पिशव्याचे तीन कप्पे असतात. हे कप्पे तयार करण्यासाठी दोनही बाजूने लाकडाच्या पट्ट्या लावून त्यांना चामडे ठोकलेले असते. या दोनही कडा तीर म्हणून ओळखल्या जातात.

**(१६) मुंडक :** भात्याचे पुढील तोंड त्याचे पुढे विस्तव असतो.

**(१७) चापन खिय्या :** कुऱ्हाड तयार करताना तप्त लाल लोखंडावर चापन किंवा चापन खिय्या. हा खिळा ठेवून कुऱ्हाडीचा चापन हा भाग ( कुऱ्हाडीचे पाते आणि दांडा घालतात तो गोल या मघला भाग) आकार देऊन तयार करतात; एक छिन्नीचा प्रकार जिचे टोक चापट असते.

अनुक्रमणिका

## ३८. काड्यांपासून वस्तू बनविणे




अनुक्रमणिका

# ३८. काड्यांपासून वस्तू बनविणे

(१) **झांजी :** कपासीच्या किंवा जंगलातील घानेरीसारख्या झुडपांपासून तयार केलेला घरावरील टिनाच्या आकाराचा ताटवा. याचा उपयोग बैलगाडीतून वरपर्यंत असा माल भरून आणताना कठड्यांच्या दोनही बाजूस भिंतीप्रमाणे हा ताटवा उभा करतात व आत माल भरतात.

(२) **खमलं :** झांजी हा मोठा ताटवा बनविताना किंवा काड्यांचे टोपले बनविताना त्याच्या वीणेतील ठराविक अंतरावरील उभ्या काड्यांचा संच.

(३) **सूपडं :** धान्य साफ करण्याचे वा धान्य पाखडण्याचे बांबूच्या पट्ट्यांपासून विणलेले सूप.

(४) **डालं किंवा पल्ल किंवा पल्डं :** कपासी किंवा घानोरी यांच्या काड्यांपासून विणलेले मोठे टोपले ज्याचा उपयोग कणसे वा कापूस वाहून नेणे यासाठी होतो.

(५) **बून :** बून हा शब्द बूड किंवा तळ यासाठी वापरला जातो. टोपले विणताना आधी त्याच्या बुडाचा भाग विणला जातो.

(६) **खमलं :** टोपले विणताना ठराविक अंतरावरील उभ्या काड्यांची गोल गोल अशी गुंफण केली जाते. या ज्या उभ्या काड्यांचा ठराविक अंतरावर गुच्छ असतो त्यांना खमलं असे म्हणतात.

(७) **कंगी किंवा कनगी :** धान्य ठेवण्यासाठीची काड्यांपासून विणलेली मोठी कनगी. जी टाकी सारखी गोल असते व तिला आतून बाहेरून शेणमातीने सारवून घेतलेली असते.


(८) **कंगीनं झाकन :** धान्य साठविण्याच्या काड्यांपासून विणलेल्या कनगीवरील काड्यांपासून विणलेले झाकण.

(९) **झान्नी किंवा झाड्नी :** घर झाडावयाचा झाडू. हे झाडू शिंदी किंवा ताडाच्या झाडाच्या पानांपासून बनविलेले असतात. या पानांना चिरनी या अवजाराने चिरून विविध प्रकारांची विण देऊन या झाडूची मूठ विणली जाते. या मुठीला (११) **कारलं** असे म्हणतात. तीचे वर या पानांचीच, (१०) **कडी** असते. या कारलं ह्या मुठीखालील झाडूचा भाग, (१२) **पड** म्हणून ओळखला जातो.

(१०) **गोट :** जेथे विणताना जोड वा जाड भाग आला आहे असा भाग गोट म्हणून ओळखतात.

अनुक्रमणिका

## ३९. मासेमारी




अनुक्रमणिका

# ३९. मासेमारी

(१) **कन्डं :** काड्यांपासून विणलेला मासे ठेवण्यासाठी वापरला जाणारा गोल असा कन्डा वा गोल असे टोपले.

(२) **डालकी किंवा पाटी :** काड्यांपासून विणलेली मोठ्या परातीच्या आकाराची टोपली तिचा उपयोग बाजारात मासे विक्रीसाठी ठेवण्यासाठी करतात.

(३) **मुडे किंवा मोडे :** काड्यांपासून विणलेले मासे धरावयाचे एक साधन. याला दोन तोंडे असतात. मासे काढून घेण्याचे तोंड मुडे हे पाण्याच्या प्रवाहात ठेवताना बांधून ठेवतात. त्यांच्या उघड्या तोंडावाटे आत गेलेल्या माशांना त्यातून बाहेर पडता येत नाही अशी या मुड्याची रचना असते.

(४) **गय :** मासेमारी करावयाचा गळ. हौसी लोक गळाच्या साह्याने मासेमारी करतात. या गळाला अन्नाचा कण वा शिदोड लावतात त्याला 'मास' असे म्हणतात.

(५) **जायं :** मासेमारी करावयाचे जाळे.

(६) **मासा :** मासा. मासे.

(७) **खवला :** मास्याच्या अंगावरील खवले.

(८) **डोया :** डोळा.


(९) **कल्ला :** मास्याचा कल्ला.

(१०) **पक :** मास्याचे पंखा सारखे बाजूचे भाग.

(११) **शेपूट :** मास्याचा शेपटीचा भाग.

अनुक्रमणिका

## ४०. कापूस पिंजणे




अनुक्रमणिका

# ४०. कापूस पिंजणे

पिंजारा हा गावोगाव भटकून ओसरीवर बसून कापूस पिंजून गाद्या भरून देण्याचे काम करीत असतो. त्याचीही काही अवजारे असतात.

(१) **धनुकली :** कापूस पिंजण्याचे धनुष्य.

(२) **गुबडा :** कापूस पिंजण्याच्या धनुष्याचा (लांब व एका टोकाला गोल वाकलेला) लाकडाचा दांडा.

(३) **दोरा किंवा तार :** कापूस पिंजावयाच्या धनुकलीचा तार किंवा दोर.

(४) **मोगरी :** मुलींच्या खेळण्यातील मोठ्या डंबेलच्या आकाराचे लाकडाचे एक साधन. याचे साह्याने पिंजारा कापूस पिंजण्यासाठी ही मोगरी तारेवर मारून कापूस पिंजतो.

(५) **काठी :** भरलेल्या गादीवर मारून कापूस समसमान पसरविण्यासाठी जी वेळूची काडी वापरतो ती काडी.

(६) **दोरानं बंडल :** दोऱ्याचे रिळ.

(७) **सुई :** गादी शिवण्याची सुई.

(८) **पत्ती :** ब्लेडपान, लेझरपत्ती.

(९) **पिंजेल कापूस किंवा रूई :** पिंजलेला कापूस, रूई.


(१०) **गाधी :** गादी.

(११) **उसी किंवा उस्ती :** झोपताना डोक्याखाली घेतो ती उशी.

(१२) **हातोसा :** धनुकलीच्या मध्यभागी दांडीवर दोरी बांधून ती छताला बांधली जाते. जेथे त्या धनुकलीला मध्यभागी दोरी बांधतात ती जागा. या जागी दोरी जागची सरकू नये म्हणून कपडे वा उशी बांधलेली असते.

अनुक्रमणिका

### ४१. बांधकामासाठी लागणारी अवजारे




[अनुक्रमणिका]

# ४१. बांधकामासाठी लागणारी अवजारे

घरांचे बांधकाम करणाऱ्याला खानदेशात गवंडी तर विदर्भात राज असे म्हणतात. अलिकडे त्यास मिस्तरी असेही म्हणतात.

**(१) गुरमूला किंवा पत्रा :** गुळगुळीत पत्र्याला वरून धरायला मूठ बसते.या पत्र्याने पृष्ठभागाला गुळगूळीतपणा व सफाईदारपणा आणता येतो.

**(२) टिपणी :** टिपणी ही पत्र्यांप्रमाणेच असून ती लाकडाची असते. लहान भागात सिमेंट वा मातीचा लेप वा गिलावा ( प्लॅस्टर) करण्यासाठी वापरतात.

**(३) रंधा किंवा रंदा :** टिपणीपेक्षा लांबीला अधिक असणारे साधन, रंधा ही दोन-अडीच फूट किंवा त्याहूनही अधिक लांब एका बाजूने गुळगूळीत फळी असून वर धरायला मूठ असते. हल्ली लाकडाच्या फळीऐवजी अल्युमिनीयमची चौकोनी लांब पट्टी वापरतात.

**(४) नैला :** खूप लहान आकाराची अशी करनी. चमच्याप्रमाणे वरच्या बाजूस सिमेन्ट घेऊन ते हव्या त्या जागी मारता येते व खालच्या गुळगूळीत भागाने त्यावर घासून तो सिमेन्ट मारलेला भाग, प्लॅस्टर गुळगूळीत करता येते. बांधकाम करताना लहान फटीत सिमेंट ढकलता येते.


**(५) थापी किंवा करनी :** नैलाप्रमाणेच पण मोठे, जास्तीचे रुंद पाते असणारे साधन. यावर जास्तीचे सिमेंट घेता येते. दोन विटांमध्ये सिमेंट टाकता येते. बांधकामासाठी नैला व करणी ह्या वापरल्याच जातात. या थापी आणि नैला दोहोंची पाती ही पत्र्यांची असतात तर मुठी ह्या लाकडाच्या असतात.

**(६) गुन्या :** नव्वद अंशाच्या कोनात येऊन मिळालेल्या दोन पट्ट्या असे गुण्याचे स्वरूप असते. बांधकाम करताना दोन भिंती ह्या बरोबर काटकोनातच बांधल्या जात आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी वेळोवेळी गुन्या लावून तपासावे लागते.

**(७) टेप :** लांबी मोजावयाची इंच व सेंटीमिटर व मीटरच्या खुणा असलेली कापडाची वा धातूची लांब पट्टी. या पट्टीला एका डबीत गुंडाळी करून ठेवता येते.

**(८) ओयंबा :** ओळंबा; भिंती व उंच जाणारे बांधकाम बाहेरच्या व आतल्या बाजूने झुकते आहे काय हे तपासून पहाण्याचे एका साधन. या ओळंब्याची **ढोलकी** (९) व **भवरा** (१०) किंवा **भोवरा** हे दोन भाग असतात. ढोलकी भागाचा आकार हा डमरूप्रमाणे असतो. याच्या दोनही बाजू गुळगुळीत असून मध्यभागी छिद्रातून दोरी ओवून त्या दोरीच्या एका टोकावर धातूचा भोवरा बसविलेला असतो. तो भोवरा जड असल्याने वरून सोडताच सरळ खाली येतो. ढोलकी ही वरच्या विटेला लावलेली असल्याने खाली जेथे जेथे भोवरा खेटेल तो भाग वरच्या विटेपेक्षा बाहेर आलेला समजतात व जेथे भोवरा खालील विटांपासून अंतर ठेवून असतो तो भिंतीचा भाग आत गेलेला समजावा.

## ४२. पक्षी आणि पक्षांची  शिकार




अनुक्रमणिका

# ४२. पक्षी आणि पक्षांची शिकार

(१) **फांद :** पक्षांना पकडावयाचा फास. हा दोन ते अडीच फूट लांब व आठ इंच उंच असतो. यात चार खाणे वा घरे असतात.

(२) **खाम :** पक्षी पकडावयाच्या फांद या फासाचे प्रत्येक घराच्या (चौकोन) उभ्या काड्या; हे खाम प्रत्येक फांदाच्या दोन जाडींना परस्परांना जोडतात.

(३) **केसारी :** केसांपासून तयार केलेला दोरा वा दोरी.**फासा :** केसांपासून तयार केलेला फास; फास.

(४) **फासा :**केसांपासून तयार केलेला फास ; फास.

(५) **फांद :** एका फांदमध्ये साधारणतः चार चौकोनात एकेक फास असतो. असा चार ते पाच फास असणारा ताटवा. असे अनेक फांद एकत्रित गड्डी करून बाधता यातात.

(६) **पाखरू :** पक्षी.

(७) **पक :** पक्षाचे पंख वा पीस.

(८) **आन्डं :** अंडे.

(९) **पाय :** पक्षाचा पाय.

(१०) **खोपा :** पक्षाचे घरटे

(११) **चोच :** पक्षाची चोच.

(१२) **डोया :** डोळा.


(१३) **शेपूट :** शेपटी.

(१४) **डंग :** वृक्षाची फांदी.

(१५) **जाडी :** पक्षी पकडावयाच्या फासच्या फांदच्या खालच्या व वरच्या बाजूच्या बांबू व बोरूच्या काड्या. या आडव्या व लांब काड्यांना जाडी असे म्हणतात.

अनुक्रमणिका

## ४३. वाद्ये




अनुक्रमणिका

## ४३. वाद्ये

(१) **पिपानी किंवा सनई :** शहनाई हे वायूवाद्य.

(२) **जीप किंवा जीब :** शहनाईचा तोंडात धरावयाच्या टोकाला बसविलेला व तोंडाने फुंकताच आवाज करणारा भाग. जीभ वा जिव्हळ्या

(३) **कानस :** शहनाईचे पुढचे धातूचे गोलाकार व लांबट असे तोंड.

(४) **भेर :** तुतारी.

(५) **गोलतरी किंवा गोलतरीनी काडी :** संबय हे चर्मवाद्य वाजविताना ज्या काड्यांचा वापर करतात त्या काड्या त्या समोरच्या टोकांना गोलाकार आढळतात.

(६) **संबय :** संबळ हे चर्मवाद्य. याचे दोन्ही भाग हे सारखेच असतात. दोहोवर चामडे बसविलेले असते. या वाद्याला वाजविताना कमरेला बांधून ते पोटाखाली समोर बांधतात व गोलतरी या काड्यांनी बडवून वाजवितात. इतर चर्मवाद्यापेक्षा हे वाद्य वाजविण्याची पद्धती ही वेगळी असते.

(७) **टाय किंवा झांबा :** टाळ किंवा झांज. झांज हे धातूच्या दोन अर्धगोल वाट्यांसारखे असून ते परस्परांवर आदळून ध्वनी निर्माण करतात. या प्रत्येक अर्धगोलाच्या केंद्रभागी छिद्र असून त्यातून दोरी ओवलेली असते. ती टाळ वाजविताना धरता येते.

(८) **डफडी किंवा खंजीरी :** खंजीरी हे चर्मवाद्य.

(९) **पव्हा, पवा किंवा पोव्हा :** मुरली किंवा बासरी हे तोंडाने फुंकून वाजवावयाचे वायू वाद्य.

(१०) **ताऱ्या :** एकतारी हे तंतू वाद्य.

(११) **पियनी :** सूर मिळविताना तंतूवाद्याची तार ओढण्यासाठीची कळ किंवा चाबी.

(१२) **तार :** तंतू किंवा तार.


(१३) **तबला :** हाताने वाजवावयाचे एक चर्मवाद्य. यात लहान व मोठा असे दोन अर्धगोल त्यावर चामडे बसविलेले असते. या दोहोंना मिळून तबला असे म्हणतात. पण त्यातील स्वतंत्र एक ज्याचा आकार लहान असतो त्यास तबला तर मोठा आकार असणारास डग्गा असे म्हणतात.

(१४) **इना :** विणा हे तंतू वाद्य.

**(१५) डग्गा :** तबला या चर्मवाद्याचा एक भाग जो तबला या भागापेक्षा आकाराने मोठा असतो. या तबला आणि डग्गा यांचे ध्वनी भिन्न असतात.

अनुक्रमणिका

## ४४. जलप्रवास



## ४४. जलप्रवास

खानदेशात तापी, गिरणा यासारख्या मोठ्या नद्या असल्याने परंपरागत अशी जलप्रवासाची साधने या नद्या पार करण्यासाठी वापरली जातात.

(१) **डुंग :** पाण्यातील लहान होडी; होडी.

(२) **खुटा :** खुंटा, होडी नदीच्या काठावरील खुंट्याला बांधून ठेवतात.

(३) **आव्हली किंवा आवल्ही** : होडी पाण्यातून वल्हवून नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वल्ह्या. या लाकडाच्या वल्ह्या पाणी मागे लोटून होडी पुढे ढकलतात.

(४) **सगुन्या** : होडीचा दिशा बदलणारे एक साधन. यात विशिष्ट आकाराची फळी असते, या आडव्या फळीला उभा दांडा बसविलेला असतो. पाण्यात ती फळीला दिशा देऊन पाण्याचा प्रवाह अडवून होडीची दिशा बदलली जाते.

(५) **तिरसूयी** : होडीच्या वरच्या कडांवर असलेला गोल हूक किंवा कडी ज्यात वल्ही अडकवून होडी वल्हवितात.

अनुक्रमणिका

# शब्दसूची

**टीप** - शब्दासमोरील अंक हा ज्या विभागात तो शब्द सापडू शकेल तो विभाग (चित्रगट) दर्शवितो तर त्या लगतचा कंसातील अंक हा त्या शब्दाचा त्या चित्रगटातील क्रम दर्शवितो. शब्दसूची ही अकारविल्ह्याने देण्यात आली आहे.


**आ**

आक
आकोडा
आकोडी
आखरी
आख्खरपेटी
आडकित्ता
आडंगात
आडनी
आडोय
आन्ड
आन्डं
आन्डखोया
आमनं
आमने
आया
आर
आरं
आरन
आर नी काठी
आरवं
आरी
आरू
आऱ्या
आवते
आवल्ही
आवूल
आळा
आंघोटा
आंबूर

**इ**

इडं
इत्ती
इत्तीनी काडी
इना
इय्या
इंदरखूर
इंद्रखूर

**उ**

उख्खय
उचटनी
उपनपाटी
उपन्ती
उमरट
उमरटना वटा
उलचून
उलचूनना चूल्हा
उलथनी
उल्हा
उसी
उस्ती
उंडा

**ए**

एकदानी
एकपाई
एखलाई

**ओ**

ओयंबा


अनुक्रमणिका

## क

कट्यारी
कट्यारीनी आरी
कठोडं
कठोडाना साटा
कडं
कडची
कडी
कडीनं भांडं
कडीना तांब्या
कडीना डब्बा
कढाय
कनगी
कना
कन्डं
कप
कयक
कयची
कयन्या
कयशी
करनी
करबत
कर्बत
कऱ्हो
कलखूटी
कलबूत
कल्ला
कंगवा
कंगा
कंगी
कंगीनं झाकन
काईपोत
काठोक
काठी
कान
कानखीई
कानस
कानोडी
कानोड्या
कामडी
कारलं
कावड
किकरं
कुच्ची
कुडधान
कुदई /यी
कुन्डं
कुऱ्हाड
कुल्ड्या
कुल्ड्यास्ना साचा
कुसली
कुस्सा
कुस्सू
कुंबी
केसारी
कैने
कैऱ्ही
कैऱ्हीस्ना घोस /घस
कोप
कोपर
कोय
कोयता
कोयपं
कोयपाट
कोयपी
कोरमगात
कोहोय
कोंडकं
कोंडा
क्यॅटली

अनुक्रमणिका

**ख**

खटली
खट्टा
खतावनी
खमलं
खरदांडी
खलबत्ता
खवला
खसरा
खंजीरी
खाट
खाम
खारीना भूगला
खालना वडप
खालनी तई
खांड
खांदा
खिडकी
खिय्या
खूटदावं
खुटदोर
खुटलं
खुटला
खुटा
खुडे
खुर /खूर
खुरपं
खुरपनी
खूर
खुरपा
खोपा

घन
घमीलं
घल्डी

**ग**

गट्टू
गड्डू
गय
गया
गरसोयी
गल्लास
गव्हान
गंगाय
गंज
गंजी
गाधी
गाला
गिरमिट
गुबडा
गुरमूला
गुन्या
गुन्ह्या
गुंडा
गोट
गोन्टं
गोऱ्हा
गोलतरी
गोलतरीनी काडी
गोल्ही
गोंडा
ग्लास

**घ**

घटे
घट्या
घट्याना पेन्ड
घडीना चाकू
घडोन्ची
घडोस्नी

**छ**

छकडं

अनुक्रमणिका

घस
घंगाय
घंटा
घंटी
घागर
घोगर
घोटा
घोडा
घोडी
घोस

## च

चकरीना डबा
चऱ्हाट
चवरंग
चंपा
चाक
चाकू
चाटू
चाडं
चापन्
चापन खिय्या
चाहूर
चितांग
चुल्हा
चोच
चौखट
च्यॅटली

छकडं गाडं ,छकडी गाडी
छगन्या
छन्नी
छिन्नी

## ज

जग
जडाव
जडावपट्टी
जाई
जाडी
जाम
जायं
जासूड
जासोड
जासोद
जिवाल्डी /जिवाळ्ी
जीउ
जीप
जीब
जीव
जूवाड
जोड
जोडकोयपं
जोतं
जोतरं

## झ

झाड्नी
झान्नी
झांजी
झूल
झेला
झेल्तं
झ्यारा
झ्यांबा

अनुक्रमणिका

**द**
दगडी
दरना खूटा
दराती
दंडा
दात
दाता
दार
दाऱ्हून
दावं
दांडा
दांडी
दुस्सेर
दोर
दोरा
दोरानं बंडल

**ध**
धनगरी जोडा
धनकुली
धमन
धाबं
धाबाना पापडे
धाव्
धाव
धुकान
धुडकं
धोपटी ३६

**न**
नई
नया
नऱ्हानी
नागर
नागरखोय
नाडा
नाडी
नात
नाथ
नाथी
नाथी
नाथीपट्टी
नाल
नाव
नैला

**प**
पई
पक
पटाशी /पटासी
पट्टा
पट्टी
पड
पडदा
पत्ती
पत्ता
परदा
परात
परोटी
पल्डं
पळं
पवं
पव्हा
पहार
पाखं
पाखरू
पाट
पाटलं

अनुक्रमणिका

पाटली
पाटा
पाटी
पाठं
पान
पानीनी वाटी
पाम्भेर
पाम्हरना लोड
पाम्हेर
पाम्हेर नाडानी दोरी
पाय्
पायं
पायतं
पायते
पायथरी
पायथोरी
पायना
पाल्हकनी
पावडा
पावडी
पावशी
पावसी
पास
पाह्यरी
पांजरी
पांभर
पाभेरं
पिढं
पिपानी
पिंजेल कापूस
पुतई
पेटी
पेटी
पेडनी
पेन्ड
पेन्ढी
पेला
पैया
पोई
पोट
पोत
पोतं
पोय
पोयपाट
पोयपाट लाटनं
पोव्हा
प्याला

**फ**

फन
फरशी कुऱ्हाड
फरांडी
फर्रे
फाय
फासा
फांद
फिट्टाप पक्कड
फिनफिन

**ब**

बईल
बच्छी
बनपट्टी
बरच्छी कुऱ्हाड
बरस
बलेडपान
बल्लम
बशी

अनुक्रमणिका

बसी
बादली
बाडगी
बारदान
बारी
बासरी
बाही
बिल्ड
बुन
बुधलं
बुध्या
बुट्या
बुड्या
बून
बेडी
बेन्नी
बेलनं
बेंडनी
बैठक पाटली
बैल
बोख्या
बोघनं
बोघनी
बोरमाय
बोखरी

**भ**

भटूर
भरगडं
भरन
भरनना दघड
भरेल कठोडं
भवरा
भाकरीस्नी डालकी
भाता
भाते भानस
भानसी
भाला
भिडं
भित
भुगला
भुगूल
भेर

**म**

मनी
मशीन
मंगयसूतरं
माकडं
माकोई
माखनीना खूटा
माचा
मायची
मावठी
मासा
माळोचा
मांडी
मांडोई
मिठोड
मिशीन
मुडे
मुतानी जागा
मुस्सय
मुस्सयी
मुंडकं
मुंदन
मूट
मेट / सुतारनी मेट
मेंडलं मोगरी

अनुक्रमणिका

मोट
मोठंगाडं
मोठीगाडी
मोडे

**य**

येठन
येल
येल

**र**

रही
रंधा
रापी
रिकाबी
रूई
रूम्हनं

**ल**

लाकड्या
लाकड्या नागर
लाखन्दोरी
लाटनं
लामदांडी
लांडगं
लेझरपान्
लोखंड्या
लोखंड्या नागर
लोड
लाहोड
लोंढनं
ल्होन्डनं

**व**

वगराय
वख्खर
वख्खरना लोड
वजन
वजरटीक
वटली
वटा
वरनदोरी
वरनी
वरल्हीतयी
वरंडी
वऱ्हाटा
वऱ्हना वडप
वसरी
वस्तरा
वंगनी
वाकडी कुदई
वाकस
वाटी
वातसाकई
वासलं
वाव्हन्
व्हड्या

**श**

शकुंतला भांडं
शामी
शार
शिई
शिपाई
शिव्वय
शिव्वळ
शिंग
शिंगाडं
शिंगाडं पाटली
शिंगाडे

अनुक्रमणिका

शेनकूर
शेप
शेपना गोंडा
शेपूट
शेमी
शेम्न
शेम्पडं

### स

सगुन्या
सनई
सम्बय
सराटा
सराटी
सऱ्या
सहान /सान्
साकई
साटली
साटलीनाकुस्सू
साटा
सानं
साबू /साबू
साबूनी वडी
सांडसी
सिंगाडं
सीकं
सींग
सुई
सुपडं
सुतारनी मेट
सुया
सुरई
सुरइनं तोंड
सुरइनं बून्
सुरइनी कडी
सुरस्या
सुरा
सोरा
सोऱ्या
सोंड
सोंदड

### ह

हाड्या
हातोडा
हातोडी
हातोसा
हादरनं
हायस्
हायसना कुस्सू
हास्ती
हांडा
हुबंगात
हेर

# अनुक्रमणिका